

# पिढ्यांचा दाणी

ना. रा. रानडे

IRBK-0105316

IRBK-0105316

म. ग्रं. सं. वाचनालय, ठा.
विषय चा. च.
अ. क्र. ५३९६

दा. क्र. - ४३९६.
वा. भा.
७९४२
३-२-६१

# ३

# पिढ्यांचा दाजी

अनुक्रम २५६६
विभाग वा. भा.
क्रमांक ७९४२
नों. दि. ३-२-६१

लेखक : **नारायण रामचंद्र रानडे, एम्. ए.**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ४३९६ नों. दि. ..............
वि. वा. भा. क्र. ..............

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0105316

मूल्य दहा आणे

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

पहिली आवृत्ति : १९५५

मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
कर्नाटक हाउस,
चिराबाजार, मुंबई २

'तीन पिढ्यांचा दाजी' म्हणजे पुरुषोत्तमराव ऊर्फ दाजी पटवर्धन. ह्यांचें चरित्र 'हरिवंशाच्या बखरीं'त त्यांचे नातु 'बाळकृष्णराव हरिहर' ह्यांनीं इतर तत्कालीन ऐतिहासिक घटनांबरोबर वर्णिलें आहे. ही बखर मिरजेचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं संपादिली आहे. त्यांच्या मतें, ही बखर इतिहासदृष्ट्या विश्वसनीय असून तींतील मजकूर सत्यास सोडून नाहीं.

पुष्कळशा बखरी तत्कालीन किंवा त्या सुमारास झालेल्या लेखकांनीं लिहिलेल्या असल्यामुळें त्यांत इतिहासकाराची निःपक्षपाती दृष्टि नेहमींच आढळते असें नाहीं. म्हणून ह्या हरिवंशाच्या बखरीचें इतिहासदृष्ट्या विश्वसनीयता हें वैशिष्ट्यच मानलें पाहिजे.

खरेशास्त्र्यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, "कोणत्याही कुळास व देशास ललामभूत होण्याजोग्या अनेक सद्गुणांनीं मंडित असा हा पुरुषोत्तमराव मोहरा होता. अशासारख्या शिलेदारांनींच आसेतुहिमाचल मराठ्यांचा दरारा बसविला होता व महाराष्ट्रदेशास 'शिपाई लोकांची विलायत' हें नांव प्राप्त करून दिलें होतें."

अशा ह्या शूर, स्वामिभक्त, स्वाभिमानी व करारी शिलेदाराचें चरित्र मूळ बखरींतील वर्णनाला व भाषेला धरून ह्या छोट्या पुस्तकांत वर्णिलें आहे.

संकलनापलीकडे प्रस्तुत लेखकानें विशेष कांहीं केलें आहे असें नाहीं. मूळ बखरकार आणि तिचे संपादक कै. वासुदेवशास्त्री खरे ह्यांच्याकडेच ह्या चरित्रलेखनाच्या श्रेयाचा फार मोठा वांटा जातो. त्यांचा लेखक ऋणी आहे.

शेवटीं सांगणें राहिलें तें इतकेंच कीं स्वतंत्र भारतांत असेच पुरुषोत्तम दाजींसारखे शूर मर्द शिलेदार निर्माण होवोत व ते भारताचें नांव दाही दिशांना उज्ज्वल करोत अशी देवाजवळ प्रार्थना आहे.

ना. रा. रानडे

१. हा मोठा पराक्रमी होईल ५
२. वांटणी मागणें हें काम दुर्बळाचें ७
३. दाजी आणि दमाजी ९
४. आमची शिलेदारांची झोळी हीच पालखी ११
५. महावस्त्राचा आणि मशालीचा बहुमान १३
६. लढनेवाला बामण तो हा ! १५
७. राक्षसभुवनची लढाई ( १७६३ ) १८
८. दाजींचें पुणेंदरबारीं वजन २०
९. कर्नाटकची स्वारी २१
१०. बारभाईंचें कारस्थान २४
११. दाजींवर विषप्रयोगाचे प्रयत्न २६
१२. दाजींच्या वक्तृत्वाची व शौर्याची चमक २८
१३. छत्तीस महिने बारभाई युद्ध ३०
१४. पुरंदरास राखण कोणास ठेवावें ? ३३
१५. स्वामिभक्त दाजींचा चौकीपहारा ३७
१६. दादासाहेबांचा बंदोबस्त ४०
१७ जसे उभयतां कारभारी तसे दाजी ४२
१८. दाजींचें पुरंदरीं सहकुटुंब सहपरिवार वास्तव्य ४४
१९. सारे माझ्या ओळखीचे आहेत ४५
२० मी असें बोलून घ्यायचा नाहीं ४८
२१ नाना आणि दाजी ५१
२२. थट्टेखोर विनोदी दाजी ५४
२३. धाडशी हिकमती दाजी ५६
२४ दाजी आणि तोतया ५८
२५ दाजींची अखेर ६०

....१

हा मोठा पराक्रमी होईल !



दोन-अडीचशें वर्षांपूर्वीची गोष्ट. सहा वर्षांचा दाजी ( जन्म स. १७२९ ) व त्याचा चुलता शिऊबा आप्पा साताऱ्यास शाहूमहाराजांना भेटण्यास जात असतां माहुलीस कृष्णातीरीं स्नानास उतरले. वाळवंटांत शिऊबा आप्पा ह्यांचीं धोतरें वाळत घातलीं होतीं. इतक्यांत एक गोसावी जवळून जात आहे असें पाहून दाजी बोलला, " अरे गोसाव्या ! आमच्या धोतरांस शिवशील. "

" अरे मुला ! तुझ्या धोतरांस आम्ही कांहीं शिवत नाहीं. " गोसाव्यानें उत्तर दिलें. सहा वर्षांचा मुलगा दाजी आणि छत्रपति शाहूमहाराज ह्यांमधला हा संवाद वाचून आश्चर्य वाटेल. हा प्रसंग इ. स. १७३६ च्या सुमाराचा आहे.

शाहूमहाराजांना शिकारीचा मोठा नाद असे. एकदा त्यांच्या मनास भ्रम उत्पन्न झाला असतां तशा स्थितींतच ते शिकारीस गेले. बरोबर नेहमींचा शिकारी कुत्रा होताच. इतक्यांत एका वाघानें महाराजांवर झडप

घातली. त्या शिकारी कुत्र्यानें वाघावर झडप घालून त्यास ठार मारलें व महाराजांचे प्राण वांचविले. ह्याचें बक्षीस म्हणून महाराजांनीं भरदरबारांत आपल्या डोक्याचें पागोटें काढून त्या कुत्र्याच्या डोक्यास घातलें. पुढें भ्रम गेल्यावर ह्या आपल्या कृत्याचा त्यांना पश्चात्ताप झाला. तेव्हांपासून डोक्यास कांहीं न घालण्याचा नेम केला तो केला ! अशा जटाधारी गोसाव्याच्या वेषांत ते दिसत. त्यामुळेंच दाजीला ते गोसावी वाटले ह्यांत नवल काय !

थोड्याच वेळांत महाराजांचा लवाजमा व सरंजाम महाराजांजवळ जमा झाला. तो पाहातांच दाजी घाबरून गेला. आपण शाहूमहाराजांना गोसावी म्हटलें हें त्याला कळून चुकलें. दाजीनें ही गोष्ट आपल्या चुलत्यांस – शिऊबा आप्पा पटवर्धन ह्यांस – सांगितली. महाराजांचे तंबूडेरे वगैरे लागून स्थिरस्थावर झाल्यावर महाराजांनीं शिऊबा आप्पास बोलावणें पाठविलें. शिऊबा दाजीस बरोबर न नेतां एकटेच भेटीस गेले. मुजरे झाल्यानंतर महाराजांनीं दाजीला बोलावून घेतलें. दाजीनें महाराजांच्या पायांवर डोई ठेविली. तेव्हां महाराजांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेवला. ते शिऊबास म्हणाले, “ शिऊबा ! हा मुलगा मोठा धीट आहे. आम्हांस ‘ गोसाव्या ! धोतरांस शिवशील ’ असें बोलला ! ”

“ महाराज, तो अज्ञान आहे ! ” शिऊबांनीं नम्रतापूर्वक उत्तर दिलें. महाराज क्षमाशील व गुणज्ञ होते. त्यांनीं दाजीस ‘ हा मोठा पराक्रमी होईल ’ असा आशीर्वाद देऊन त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला, शेलापागोटें व वस्त्रें दिलीं आणि त्याचा गौरव केला. अशा प्रकारें केवळ सहा वर्षांच्या मुलानें – दाजीनें – महाराजांची कृपा संपादून भावी पराक्रमी आयुष्याची मुहूर्तमेढच रोविली.

....२

# वांटणी मागणें हें काम दुर्बळाचें !



दाजीचा हा हूडपणा व ही धाडसी वृत्ति पाहून त्याचे चुलते रामचंद्र हरि ह्यांनीं दाजीस त्याच्या वडिलांपासून मागून घेतलें. रामचंद्रपंत आप्पा ह्यांस पोटीं पुत्रसंतान नव्हतें, तेव्हां दाजीवर ते आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें प्रेम करीत व आपल्या स्वारीशिकारींत त्याला आपल्या बरोबरीनें हिंडवीत. त्यामुळें दाजीच्या अंगच्या गुणांची वाढ होण्यास आयतेंच क्षेत्र सापडलें. त्याची मुंजही त्यांनींच केली. दाजी दहा-अकरा वर्षांचा होतांच त्याचें लग्नही उरकून टाकलें. त्या काळीं इतक्या लहान वयांत मुलांचीं लग्नें करीत. मुलगी ' अष्टवर्षा भवेत् कन्या ' अशा वयाचीच असे !

रामचंद्र आप्पा ह्यांनीं शिकारी बहुत केल्या. ते एका घोड्यानिशीं श्रीमंत चिमाजी आप्पा ह्यांजपाशीं राहिले. पहिल्या बाजीरावसाहेबांबरोबर उत्तर हिंदुस्थानच्या स्वारींत रामचंद्र आप्पा होते. माळव्याचे सुभेदार राजे सवाई जयसिंग ह्यांनीं एका अटीवर बाजीरावास माळव्याची चौथाई व

सरदेशमुखी देण्याचें कबूल केलें. ती अट अशी: 'पेशव्यांकडील एक भालाईत व जयसिंगाचा एक भालाईत ह्यांची समोरासमोर लढाई व्हावी; त्यांत जयसिंगाचा भालाईत मारला गेल्यास पेशव्यांस चौथाई मिळावी.' बाजीरावसाहेबांनीं रामचंद्र आप्पास आपला भालाईत निवडून द्वंद्वयुद्धास पाठविलें. जयसिंगाचा राजपूत भालाईत व रामचंद्र आप्पा ह्यांच्या द्वंद्वयुद्धांत राजपूत भालाईत रामचंद्र आप्पांनीं आपल्या अचूक भालाफेकीनें ठार मारला. अशा रीतीनें पेशव्यांस जय मिळून जयसिंगानें माळव्याची चौथाई व सरदेशमुखी पेशव्यांस दिली ( १७३५ ).

पुढें वसईचा प्रसिद्ध रणसंग्राम झाला. त्यांतही चिमाजी आप्पाबरोबर ह्या रामचंद्र हरीनेंच हल्ल्याच्या वेळेस निशाण चढविलें ( १७३९ ). ह्याच सुमारास रामचंद्र हरीला मुलगा झाला. तोच पुढें प्रख्यात परशुराम-भाऊ पटवर्धन म्हणून योग्यतेस चढला. अशा ह्या शूर चुलत्याच्या प्रोत्साहनानें व शिकवणीनें दाजीच्या अंगच्या शौर्यधैर्यादि गुणांचा चांगलाच विकास झाला.

दाजी बारा वर्षांचा झाला त्या वेळीं रामचंद्र हरि मृत्युशय्येवर पडले. त्यांचे प्राण घुटमळूं लागले. त्यांना वाटे, 'दाजी आपल्या मुलाबरोबर—परशुरामभाऊबरोबर—वांटणी मागेल. उगाच आपण भाऊस शल्य करून ठेवलें!' दाजी जवळच होता. त्यानें मृत्युशय्येवर पडलेल्या चुलत्याच्या गळ्यावर हात ठेवून वचन दिलें: 'माझे तळहातास केंस कांहीं आले नाहींत. वांटणी मागणें हें काम दुर्बळाचें! मी कांहीं वांटणी मागणार नाहीं.' ह्या बाणेदार वचनानें चुलत्याचें समाधान झालें. त्यानें सुखानें प्राण सोडला!

---

**तळहातास केस न येणें**—( तळहाताला कधींच केस येत नसतात ) असमर्थ नसणें, अंगांत धमक असणें.

## .... २

## दाजी आणि दमाजी



शाहूमहाराज साताऱ्यास ,मराठेशाहीचे छत्रपति म्हणून कारभार पाहूं लागल्यावर त्यांना एक प्रबळ प्रतिस्पर्धी निर्माण झाला. महाराणी ताराबाई हिनें कोल्हापुरला स्वतंत्र गादीची स्थापना केली व शाहूशीं झगडा सुरू केला. तिनें आपल्या मदतीस दमाजी गायकवाड ह्यास गुजराथेंतून बोलावून घेतलें. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याकरितां पेशवे नानासाहेब ह्यांनीं नाना पुरंदरे ह्यांस साताऱ्यास रवाना केलें होतें. बरोबर पटवर्धन सरदारांचीं पथकेंही पुण्याहून रवाना झालीं. परशुरामभाऊ लहान असल्यामुळें दाजीच्या — गोपाळरावाच्या — थोर सरदारीकडे पाहून तें पथक चालू राहिलें होतें. ह्याबद्दल इतर सरदार मंडळींमध्यें कुजबूज सुरू झाली. तेव्हां दाजीनें आपल्या दुःखी चुलतीचें समाधान केलें व तिला आपण साताऱ्यास विशेष पराक्रम करून दाखवूं, नाहीं तर देशांतरास जाऊं असें अभिवचन दिलें.

पागेंतील मानकरी शिपाई घेऊन दाजी साताऱ्यास गेला. मागाहून स्वतः पेशवे साताऱ्यास येऊन त्यांनीं दमाजीस कैद केलें त्या वेळीं


दाजीनें चांगलें कामकाज केलें. त्या वेळेपासून श्रीमंत नानासाहेबांची दाजीवर पूर्ण मर्जी बसली ( १७५१ ).

पुढें ताराबाईशीं तह होऊन दमाजीनें स्वदेशीं गुजराथेंत जावें असें ठरलें. त्या वेळीं श्रीमंत नानासाहेब ह्यांनीं दमाजीस भेटीस बोलावलें. डेऱ्यांत पेशव्यांबरोबर दाजी होताच. दमाजी येत आहे असें पाहून सेवक येतात तोंच दाजीनें श्रीमंतांपुढें जोडा ठेवला. श्रीमंतांना तें चमत्कारिक वाटलें. तेव्हां दाजी बोलला, "महाराज, आम्ही आपले चाकर. जें काम पडेल तें आम्हीं करावयाचें. प्रसंगास आम्ही जोडाही उचलणार व लढाईंत मरूनही जाणार! दमाजी इतके नजीक आले तेव्हां त्यांस सामोरें जाण्यास वेळ लागला तर, आपल्याकडे अव्यवस्था आहे असें दिसेल ना?" दाजीचें हें उत्तर श्रीमंतांस लीनतेचें वाटलें. नंतर दाजीसमवेत श्रीमंत दमाजीस सामोरे गेले. दमाजीनें त्यांचा हात धरून आंत डेऱ्यांत आणून बैठकीवर बसविलें. श्रीमंतांनीं दाजीची ओळख करून दिली. 'साताऱ्यास लढाई झाली तींत पराक्रम करून आपला पराभव करणारे पुरुषोत्तमराव ते हेच!' दमाजीस ती गोष्ट लागली व तो गप्प राहिला. पुढें पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन दमाजींस व त्यांच्या मानकऱ्यांस वस्त्रें दिलीं. दमाजीनें जातांना श्रीमंतांस दुसऱ्या दिवशीं आपल्या डेऱ्यास परत-भेटीस बोलाविलें. बरें म्हणून श्रीमंतांनीं निरोप दिला.

श्रीमंतांनीं दाजीस आपणांबरोबर दुसऱ्या दिवशीं दमाजीकडे येण्या-विषयीं सांगून ठेविलें. ठरल्या वेळीं श्रीमंत तयारी करून राहिले तरी दाजीचा पत्ताच नाहीं! दोनचार बोलावणीं गेल्यावर स्वारी एकदाची आली. नंतर ते दोघे दमाजीच्या भेटीस गेले. दमाजी आपण होऊन दाजीस भेटला. दाजीची ओळख दमाजीस पुरी पटली होती. पानसुपारी, अत्तर-गुलाब झाल्यावर वस्त्रें देण्याच्या वेळीं श्रीमंतांनीं पहिला मान दाजींचा करविला. अर्थात्च श्रीमंतांना देण्यासाठीं आणलेलीं वस्त्रें दमाजीस दाजीला द्यावीं लागलीं. नंतर दमाजीनें तशींच दुसरीं वस्त्रें आणवून

श्रीमंतांस दिलीं. श्रीमंत आणि दाजी निरोप घेऊन निघाले. श्रीमंतांनीं आपल्या बरोबरीनें दाजीचा मान-सन्मान करवून घेतला. दाजी कृतज्ञतेनें हात जोडून बोलला, " स्वामींचे मनांतून आम्हांस वाढवावें असें आहे, त्यापेक्षां आम्हांस काय कमी ! " ह्याप्रमाणें दाजींनीं श्रीमंत नानासाहेब पेशव्यांचा पूर्ण लोभ संपादन केला.

## .... ४ आमची शिलेदारांची झोळी हीच पालखी



इ. स. १७५५ त श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब हे सावनूरच्या नबाबावर स्वारी करण्यास निघाले. बरोबर दरोबस्त पागेपथके होते. प्रकृति नीट नसल्यामुळें दाजी मंगळवेढ्यास होते. तेव्हां श्रीमंतांच्या सांगण्यावरून गोपाळरावदादांनीं दाजीस पत्र धाडून कळविलें कीं, ' प्रकृति बरी असल्यास सावनूरला निघून यावें. ' दाजी सुमुहूर्त पाहून निघाले. सावनूरला येतांच श्रीमंतांची गांठ घेतली. सोबत गोपाळरावदादा होतेच. नमस्कार चमत्कार झाल्यावर श्रीमंतांनीं दाजीची विचारपूस केली. नंतर किल्ला सर-करण्याविषयीं गोष्टी निघाल्या. मोर्चे बसून आठ-पंधरा दिवस झाले होते तरी किल्ल्यांतील

कांहींच बातमी लागली नव्हती. श्रीमंतांकडून हें वर्तमान कळतांच दाजींनीं तें बातमी मिळविण्याचें काम पत्करलें. बरोबर दोनशें स्वार घेऊन दाजी तडक निघाले व किल्ल्याभोंवतीं टेहेळणी करूं लागले. इतक्यांत किल्ल्यालगतचे कुरणांतून किल्ल्यांत गवत नेण्यासाठीं पांचपन्नास तट्टें घेऊन कांहीं मजूर व स्वार गवत कापण्यास आले होते. त्यांच्याशीं थोडीशी लढाई करून दाजींनीं त्यांचा पाडाव केला. तीं तट्टें व स्वार सर्व धरून, श्रीमंत दरबारांत बसले असतांच अवघ्या चार घटकांत दाजी येऊन दाखल झाले. श्रीमंतांस आश्चर्य वाटलें. ते भाऊस किंचित् रागानें बोलले, " अरे भाऊ, पुरुषोत्तमराव नुकते आले, अद्यापि कंबर देखील सोडिली नाहीं, तों आम्हांस आठपंधरा दिवस येथें येऊनही जें साधलें नाहीं तें काम त्यांनीं चुटकीसरसें पार पाडलें! किल्ल्यांतील बातमीही लागली व घोडींही पागेस लागलीं! गोपाळरावांनीं असले मनुष्य घरीं ठेविले होते!"

लगेच दुसऱ्या दिवशीं लढाईस तोंड लागलें. नानासाहेब व भाऊसाहेब सर्व फौजेनिशीं तयार झाले. सावनूरकर नबाबाचे पठाण किल्ल्याच्या तटाखालील जमिनीवर प्राणपणानें ठाण मांडून बसले व तिरंदाजी करूं लागले. श्रीमंतांनीं गोपाळरावदादांस हांक मारून पुढें जाण्याची आज्ञा केली. खांद्यावर भाला घेऊन व स्वार होऊन गोपाळराव तसेच पुढें निघाले. जातांना पुटपुटले, " आज माझे पंगतीस भाऊबंदांचीं ताटें पंचवीस जेवतात, परंतु आज मरावयास मी मात्र एकटा!"

पुरुषोत्तमराव दाजींच्या कानीं हे शब्द पडतांच ते आपला घोडा पुढें दामटून बोलले, " अरे दादा, तुला कळलें का? जे तुझ्या पंक्तीस जेवतील ते मरतील, पण मागें सरणार नाहींत!" असें बोलून जे तडक निघाले ते खंदकापर्यंत गेले व त्यांनीं एका पठाणास ठार मारिलें. इतक्यांत त्यांना पठाणांच्या तिरंदाजीपैकीं एक बाण लागून ते जखमी झाले. श्रीमंतांनीं हें पाहून त्यांना आणण्यास पालखी पाठविली. तों पटवर्धनांच्या खाजगीच्या

स्वारांनीं बाणांची झोळी करून त्यांत दाजीस ठेवलें. श्रीमंतांजवळ येतांच दाजी बोलले, "आम्ही श्रीमंतांचे असले पालखींत बसत नाहीं. आमची शिलेदारांची झोळी हीच पालखी!" हें ऐकतांच श्रीमंतांनीं तेव्हांपासून दाजींना पालखी दिली. तींत बसून ते गोटास आले. आपल्या हातानें तीर उपसून टाकला! जखमा शिवणाऱ्यांनीं भीतभीतच जखमा शिवल्या! श्रीमंतांनीं सावनूरचा बंदोबस्त केला व स्वारी पुण्यास आली. आल्यावर दाजींना पालखीसुद्धा ३५०० रु. तैनात करून दिली. ह्याप्रमाणें दाजींचा श्रीमंतांकडे मानसन्मान वाढला व ते पालखीपदस्थ झाले!

.... ५

## महावस्त्राचा आणि मशालीचा बहुमान



पानिपतच्या घनघोर संग्रामांत मराठ्यांचा भयंकर पराभव झाला. विश्वासराव मरण पावला, म्हणून भाऊसाहेब गर्दीत मिसळले. फौजदौलत गारद झाली. भाऊसाहेबांचा किंचित् रोष असल्यामुळें पटवर्धनांची फौज पानिपतास गेली नव्हती, पुण्यासच होती. पानिपतच्या संहाराची वार्ता ऐकून श्रीमंत

नानासाहेब पन्नास हजार फौजेसह नर्मदेपर्यंत गेले. हेतु हा कीं अब्दाली दक्षिणेकडे येऊं नये. पूर्वी नादिरशाहानें दिल्ली लुटली तेव्हां तो दक्षिणेंत येऊं नये म्हणून पहिले बाजीरावही माळव्यांत असेच फौज घेऊन गेले होते.

असो. ह्या धपक्यानें श्रीमंत नानासाहेबांस भ्रम झाला. त्या भ्रमांत ते थोरांमोठ्यांसही छडीनें मारीत; त्यामुळें मंडळी फारशी जवळ जाईनाशी झाली. एकदा नर्मदातीरीं श्रीमंत स्नान उरकून प्रातःसंध्या करीत होते. सूर्याला अर्घ्य देत असतां त्यांचा तोल गेला. तों नारायणराव नाना ह्यांनीं त्यांस सांवरलें. श्रीमंत बोलले, "दुसरा कोणी असता तर कमचीनें–छडीनें–मारलें असतें!" हें ऐकतांच पुरुषोत्तमराव (दाजी) बोलले, "नारायणराव ह्यांचा अपराध कोणता? आपण पडतां आणि सर्व लोक हसते व म्हणते कीं जवळ होते ते आंधळे होते कीं काय?" श्रीमंत बोलले, "मला विटाळ जाहला." त्यावर दाजी म्हणाले, "पुन्हा स्नान करावें!" असें म्हणतांच श्रीमंत हसूं लागले व बोलले, "अरे पुरुषोत्तमराव, तूं बोललास म्हणजे माझा राग कोणीकडे जातो न कळे!"

पुढें नर्मदातीरावरून श्रीमंत पुण्यास आले. पुरुषोत्तमरावांस वरचेवर भेटीसाठीं बोलावणें पाठवीत. गोविंदपंत नाना म्हणाले, "तूं वरचेवर श्रीमंतांकडे जातोस. एखादे वेळेस कमच्यानें मारतील; मग आम्हांस तोंड दाखवावयास नको!" दाजी बोलले, "मला श्रीमंतांकडून निरोप देववून घरास पाठवावें. श्रीमंत निरोपच देणार नाहींत!" दाजीवर श्रीमंतांचा लोभ असा विलक्षण जडला होता.

कोणी एके समयीं दहा बारा घटका रात्रीं श्रीमंतांचें बोलावणें आलें. दाजी भेटीस गेले तों श्रीमंत उभयतां पलंगावर बसलीं होतीं. श्रीमंतांनीं दाजीस हात धरून पलंगावर बसविलें. बाईसाहेब खालीं बसल्या. मागील गप्पागोष्टी निघाल्या. मध्यरात्र उलटली. दाजी म्हणत, "आतां रात्र जाहली. उद्यां उजाडायचें नाहीं काय?" श्रीमंत म्हणत, "तुझ्या गोष्टी ऐकल्या म्हणजे मला किंचित् स्वस्थ वाटतें!" नंतर खुषींत येऊन श्रीमंतांनीं

आपल्या अंगावरची पांढरी शालजोडी काढून पुरुषोत्तमराव ह्यांच्या अंगावर घातली. बाईसाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवून दाजी निघाले ते आपल्या वाड्यांत मशालीनें आले. अशा रीतीनें पांढऱ्या शालजोडीच्या महावस्त्राचा व मशालीचा बहुमान मिळवून दाजी घरीं आले व गोविंदपंत नानांच्या पायां पडले. शालजोडी पुढें ठेवली. नानांस संतोष झाला. दाजींनीं श्रीमंतांची पूर्ण कृपा संपादन केली ( एप्रिल १७६१ ). पुढें दोन महिन्यांतच २३ जून १७६१ रोजीं नानासाहेब वारले.

## ६ .... लढनेवाला बामण तो हा !



पुढें कांहीं काळ श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब ह्यांची कारकीर्द सुरू झाली. श्रीमंत नानासाहेबांचे पुत्र माधवराव व नारायणराव हे दादासाहेबांचे अज्ञातवासांत होते. पेशवाईचा कारभार दादासाहेब पाहात. वस्तुतः पेशवाईचीं वस्त्रें माधवराव ह्यांस मिळावयाचीं. पटवर्धन मंडळी माधवरावांच्या तंत्रानें वागत, म्हणून दादासाहेबांचा पटवर्धनांवर रोष! माधवरावांच्या विचारें पटवर्धन मंडळी टाकोटाक पुणें सोडून मिरजेस जाऊन राहिली.

दादासाहेबांनीं पटवर्धनांचें पारिपत्य करण्यासाठीं मागोमाग फौजा रवाना केल्या. पटवर्धन मंडळीपैकीं गोपाळरावदादा व नारायणराव मोंगलाईंत जाण्यासाठीं निघाले. मिरज लढविल्याखेरीज दादासाहेबांच्या स्वाधीन करूं नये असें त्यांनीं दाजीस बजाविलें. दाजींवर मिरज लढविण्याची बिकट कामगिरी येऊन पडली !

सर्व पटवर्धन मंडळी मिरजेच्या किल्ल्यांत येऊन राहिली. कांहीं बायकामुलें कोंकणांत गुप्तपणें जाऊन राहिलीं. दाजींचें पहिलें कुटुंब गोपिकाबाई. ती वारल्यावर दाजींनीं दुसरें लग्न केलें होतें. ही द्वितीया पत्नी आपल्या सहा महिन्यांच्या मुलाला – हरिहरराव ह्याला – घेऊन कोंकणांत आजोळीं राहिली. अशा रीतीनें कांहीं बायकामुलांची व्यवस्था करून दाजी मिरजेचा किल्ला लढविण्यासाठीं सिद्ध झाले.

दादासाहेब व त्यांचे कारभारी सखारामबापू ह्यांना गोपाळराव मोंगलाईंत गेले हें ऐकून फार राग आला. तशांत कारभारी सखारामबापू व गोपाळराव पटवर्धन ह्यांचा अत्यंत द्वेष असल्यामुळें पटवर्धन मंडळीचा पाय भुईस न लागावा म्हणून कारभाऱ्यांचा प्रयत्न मोठा ! तेव्हां खुद्द दादासाहेबच फौज घेऊन पटवर्धनांचें पारिपत्य करण्याकरतां व मिरजेचा ताबा घेण्याकरतां १७६२ च्या डिसेंबरांत निघाले.

दाजींनीं एक महिनाभर किल्ला लढविला. दाजी व भास्करपंत आप्पा ह्यांना त्या काळांत अहोरात्र झोंप नाहीं ! दुसऱ्या हल्ल्याच्या वेळीं लाकडें घालून वेशीचा दरवाजा जाळतात असें पाहून दाजींनीं किल्ल्याचे तटावरून बोंब ठोकली, "अरे किल्ला गेला ! किल्ला गेला !" हें ऐकून किल्ल्यांतील पांचशें लोकांसह जमातदारानें दाजीस मागें लोटलें. तो बोलला, "अरे बामणा, असा आरडतोस कां ? आम्ही इतके मरूं तेव्हां किल्ला जाईल. आतां आज तमाशा तर पाहा !" असें म्हणून सर्वांनीं ढाल-तलवारी बांधल्या व खालील हल्ल्याच्या लोकांच्या डोक्यांवर तटावरून उड्या घेऊन, पांच हजार गारदी चालून आले त्यांचा हल्ला परतविला. दादासाहेब हें


सर्व समक्ष पाहात होतेच. ते आश्चर्यचकित होऊन बोलले, "अशीं माणसें पदरीं बाळगणारे धन्य होत! किल्ल्यावरून उड्या टाकून हल्ला परतविला ही गोष्ट परम कठीण. किल्ला कांहीं लढून सर होणें शक्य नाहीं!" दादासाहेबांनीं सल्ल्याचें बोलणें सुरू केलें. परंतु त्यांच्याकडे किल्ल्यांतून जाण्यास कोणी धजेना! तेव्हां ढाल-तलवार घेऊन कांचा मारून दाजी बाहेर पडले व श्रीमंतांच्या लष्करांत आले. लष्करचे मुसलमान आपापसांत म्हणूं लागले, 'लढनेवाला जो बामण तो हा!' दाजी थेट श्रीमंतांजवळ गेले. नमस्कार करून ढाल-तलवार पुढें ठेवली. श्रीमंत बोलले, "मी येथें आलों, मला यश द्यावें." ह्यावर दाजी म्हणाले, "आम्ही स्वामींचे चाकर. किल्ला स्वामींचा. लोक म्हणतील, किल्ला ब्राह्मणाकडे, श्रीमंतांची स्वारी येतांच लढविलेखेरीज दिला. ढाल-तलवार पायांपाशीं ठेविली आहे. आम्हांस निरोप द्यावा." तों श्रीमंत बोलले, "तुम्हांला ढाल-तलवार दिली ती परत घेण्यासाठीं नाहीं. ती तुमची तुम्ही घ्या."

नंतर पुरुषोत्तमरावांनीं–दाजींनीं–किल्ला खालीं करण्यास तीन दिवसांची मुदत मागून घेतली. मातबर गृहस्थ जामीनकीस ठेवून सर्व सामान-सुमान, पैसाअडका वगैरे कुरुंदवाडास न्यावा असें ठरलें. ह्या अल्पकाळांत श्रीमंतांनीं जामीनदाराच्या मुलास फितवून पटवर्धन मंडळीस दगाफटका करण्याचें योजिलें. ही बातमी कळतांच दाजींना राग आला. त्यांनीं रातोरात ह्या फंदफितुरीचा पूर्ण बंदोबस्त करून सर्व मंडळी सुखरूप कुरुंदवाडास रवाना केली. पुढें एक वर्षांत दादासाहेबांची मर्जी संपादन करून दाजींनीं मिरजेची सनद मिळविली. पण ती स्वतःसाठीं नव्हे, तर वडीलपणाची मर्यादा राखून 'गोविंद हरि' ह्यांच्या नांवानें घेतली. ह्याप्रमाणें निरपेक्षपणानें वागून दाजींनीं भाऊबंदांवर उपकार केले.

.... ७

# राक्षसभुवनची लढाई

( १७६३ )



गोपाळरावदादा निजामाकडे गेले होते ते रघुनाथराव दादासाहेबांच्या रोषामुळें, नबाबाची नोकरी करण्यासाठीं नव्हे. दादासाहेबांवरील रागामुळें गोपाळराव व नबाब ह्यांनीं मराठी प्रांतांवर चाल केली. नबाबानें पुणें शहरावर स्वारी करून आगी लावल्या. ही गोष्ट पटवर्धनांस न खपून त्यांचें व नबाबाचें वितुष्ट आलें. दाजींनीं श्रीमंतांकडे संधान बांधून त्यांची समजूत केली व त्यांचा पटवर्धन मंडळीवरील राग कमी झाला. पुढें राक्षसभुवनच्या लढाईत खासा नबाब, दिवाण विठ्ठल सुंदर व मोंगल फौज एका बाजूस व श्रीमंत दादासाहेब, बरोबर माधवराव व नारायणराव आणि पेशव्यांची फौज दुसऱ्या बाजूस. जंगी लढाई झाली. पेशव्यांच्या फौजेच्या माऱ्यापुढें मोंगल किंचित् माघार घेऊं लागले, परंतु विठ्ठल सुंदर ह्यानें त्यांना प्रोत्साहन देऊन सरळ दादासाहेबांचाच हत्ती वळविण्याचा हुकूम केला. श्रीमंतांचा चवरीबारदार जखमी झाला, तेव्हां श्रीमंतांस धीर धरवेना. त्यांनीं आपल्या माहुतास हत्ती खालीं बसविण्याची

सूचना दिली. माहुतानें अत्यंत नाखुषीनें तसें करतांच मराठी फौज दादासाहेब मारले गेले असें समजून बेदील झाली. श्रीमंतांचा हत्ती मोंगलांनीं वळविला.

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं माधवरावसाहेब व पांचशें असामी घोड्यावर स्वार तयार होते. माधवराव त्या शूर मानकऱ्यांस उद्देशून म्हणाले, " दादासाहेबांचा हत्ती वळविला हें पाहातां काय? व्हा पुढें. मागाल तें बक्षीस देऊं! मी धनी नव्हे कीं काय?" तेव्हां स्फूर्ति येऊन महादजी शितोळे ह्या मानकऱ्यानें घोडा पुढें घालून शत्रूच्या व्यूहांत प्रवेश केला, विठ्ठल सुंदराचा माहुत भाल्यानें ठार केला व परत येऊन श्रीमंतांस मुजरा केला. ह्या लढाईत दिवाण विठ्ठल सुंदर व त्याचे पुत्र ठार झाले. मोंगलांचा पूर्ण पराभव झाला.

श्रीमंत दादासाहेब ह्यांचा हत्ती माघारा वळविला तेव्हां अंबारींत श्रीमंत माधवरावसाहेब ह्यांस बोलाविलें. गोपाळरावदादांना बरोबर घेऊन ते अंबारींत जाऊन बसले. दादासाहेब ह्यांच्या मांडीखालील तलवार गोपाळरावांनीं हळूच काढून घेतली. दादासाहेबांनीं मागें वळून पाहिलें व "तुम्ही आलां काय?" म्हणून गोपाळरावांस विचारलें. दादासाहेबांवर रुसून निजामाच्या आश्रयास गेलेले गोपाळराव अशा तऱ्हेनें श्रीमंतांकडे परत आले. श्रीमंत शहाजानें वाजवीत डेऱ्यास आले. ह्या लढाईत अपूर्व विजय मिळविल्यामुळें माधवरावसाहेब ह्यांचा अंमल सुरू होऊन दादासाहेबांनाच त्यांनीं नजरकैदेंत ठेविलें. माधवरावसाहेबांचा अंमल पुढें आठ नऊ वर्षें राहिला. त्यांनीं पटवर्धन मंडळीवर व विशेषतः दाजींवर पूर्ण मर्जी ठेविली.

---

**चवरीबारदार**—चवरी (चमरी–वनगाय, तिच्या केसांचा झुपका) वारणारा, ढाळणारा.

**शहाजान**—मोठा नगारा, मंगल वाद्य.

....८

# दाजींचें पुणेंदरबारीं वजन



"आमची ओळख पुण्यास आहे किंवा नाहीं हें समजलें पाहिजे" असें दाजी अभिमानानें बोलत. श्रीमंत माधवरावांचा दाजींवर मोठा विश्वास होता. मंगळवेढ्यास बापूजी नाईक भोसकर सावकार होते. त्यांचा व शिवाजीपंत म्हैसकर ह्यांचा कांहीं देण्याघेण्यासंबंधीं खटला पडला. भोसकर ह्यांजवर दाजींचा लोभ मोठा. शिवाजीपंतांनीं पुण्यास जाऊन भोसकर ह्यांजवर सरकारचें ताकीदपत्र आणलें व दोन असामी ढालाईत रवाना केले. 'देखत चिठी भोसकर ह्यांस हुजूर रवाना करणें' असा हुकूम मामलेदार मेघश्यामराव बापू ह्यांस झाला. मेघश्यामराव बापू ह्यांनीं भोसकर ह्यांस बोलावून सांगितलें कीं, "तुम्हांस पूर्वींच सांगत होतों कीं, हत्तीशीं झुंज खेळूं नये, तें प्रत्ययास आलें. आतां पुण्यास जावें."

भोसकर दाजींकडे गेले. दाजींनीं ढालाइतांस सहा दिवसांची मुदत मागून घेतली. मनाई आणून देऊं असें सांगितलें. एका स्वारास पत्र देऊन गोविंदरावतात्या ह्यांजकडे पुण्यास रवाना केलें. तात्यांनीं त्या

स्वारासह थेउरास श्रीमंत माधवरावसाहेब प्रकृति बिघडल्यामुळें राहात होते त्यांजकडे जाऊन सांगितलें, " मी पुरुषोत्तमराव दाजींच्या कामास आलों. " ढालाइतांस श्रीमंतांनीं तत्काळ मनाई देवविली व लगेच सुचविलें कीं, " पुरुषोत्तमरावांनीं म्हैसकर व भोसकर ह्यांचा तंटा विचारांत घेऊन निकालांत काढावा. ते गैरवाजवी करणार नाहींत. पुरुषोत्तमराव ह्यांची खातरजमा मला आहे. " ह्याप्रमाणें पत्र देऊन स्वारास रवाना केलें. तो स्वार मंगळवेढ्यास सहाव्या दिवशीं आला. दाजींनीं तें पत्र मामलेदारास दाखविलें. " आमची ओळख पुण्यास आहे किंवा नाहीं हें समजलें पाहिजे ! " ह्याप्रमाणें श्रीमंतांची दाजींविषयीं खातरजमा होती.

## ....९ कर्नाटकची स्वारी



पटवर्धन मंडळींत दाजींसह पांच भाऊ म्हणजे भारती वीर होते. वडील गोपाळराव, दुसरे नीलकंठराव, तिसरे कोन्हेरराव, चौथे नारायणराव, पांचवे पुरुषोत्तमराव. असा त्यांचा शिपाईगिरींतील अनुक्रम होता.



म. ग्रं. सं.
५३९६

गोपाळरावदादा मिरजेस वारल्यावर कर्नाटकच्या स्वारीस त्रिंबकराव मामा सेनापति होते. बरोबर सारे पटवर्धनही होते. एकदा मामांनीं भालदारामार्फत पटवर्धनांस कळविलें कीं, "तुमचें पथक कहीसमागमें (लष्कराची दाणावैरण आणणाऱ्या टोळीबरोबर) नेमिलें आहे, तरी कही संभाळून आणणें."

हें पोलीस-चौकीदाराचें साधें काम आपणाकडे दिलेलें पाहून पुरुषोत्तमराव संतापले. त्यांनीं उत्तर दिलें, "आमचें पथक कहीसमागमें जाणार नाहीं!" भालदार तो निरोप घेऊन दहावीस पावलें जाऊन माघारा आला व बोलला, "हे मानपान गोपाळरावदादा ह्यांजबरोबर गेले. आतां जी चाकरी सांगूं ती करून राहावें, असा मामांचा हुकूम आहे!"

दाजी बोलले, "अरे, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले—ज्या त्यांच्या भाऊबंदांनीं त्यांना प्राणपणानें साह्य केलें—ते जिवंत आहेत!"

भालदार गेल्यावर दाजी पालखींत बसून मामांकडे गेले. मामांनीं कहीबरोबर जाण्याची गोष्ट काढली. "हैदरखान ह्याचे बेदडे—लुटारू—चोहोंकडे फिरतात. कही निभावून येईनाशी जाहली. तुमच्यासारखें मातबर पथक पाठवून ती आली तर निभावेल!" दाजी बोलले, "हें खरें, पण तुम्ही शेवटीं निरोप सांगोन पाठविला. आपण कांहीं नवे आलों नाहीं. आपण हैदरखानाचे माणिक चौकांत (राज्याच्या मध्यभागीं) आहों. कोण मनुष्यें कशीं हें तुम्ही नजरेनें पाहातां. तुम्ही जुने माहितगार म्हणून उगेच बसलों, नाहीं तर चांगली शोभाच केली असती!" ह्याप्रमाणें तोंडावर बोलून लष्करांत परत आले. लष्करांतील सर्वांना सांगितलें "आम्ही जाऊन जें पाहिजे तें बोलून आलों. परंतु उद्यां प्रसंगास जर नांव राखलें तर बरें, नाहींपेक्षां पडलें काम करावें लागेल." हें ऐकून सर्वांनीं बेलभंडार घेतला जे, 'प्रसंगास आम्ही मागें सरणार नाहीं.'

२२...

पुढें मोती तलावाच्या लढाईत ( १७७१ ) हैदरखानाचा पूर्ण पराभव झाला, परंतु नीलकंठराव ह्या लढाईत एका अवघड कामगिरीवर असतां गोळी लागून ठार झाले. पुढें तेरावे दिवशीं त्रिंबकराव मामा समाचारास आले व बोलले, "नीलकंठराव आम्हांस टाकून वैकुंठास गेले."

पुरुषोत्तमराव बोलले, "अहो त्रिंबकराव! कोणते लढाईस आमचा पुरुष पडला नाहीं अशी लढाईच नाहीं. दर लढाईस आमचा एक पुरुष खर्च होतो, तेव्हां श्रीमंत सरंजाम चालवितात! आम्हीं शिरें हातांत घेतलीं आहेत. आम्हीं कांहीं नुसती सोयरीक जोडून रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाहीं!" असें म्हणतांच त्रिंबकराव मामा उमजले. त्यांनीं आपली चूक कबूल केली. "आपण सर्वांनीं मजवर कृपा करावी," असें म्हणून दाजींचा राग शांत केला.

अशा रीतीनें पुरुषोत्तमराव दाजी कोणाचीही भीडभाड ठेवीत नसत. सगळा रोखठोक व्यवहार!

गोपाळरावदादा मिरजेस वारल्यावर कर्नाटकच्या स्वारीस त्रिंबकराव मामा सेनापति होते. बरोबर सारे पटवर्धनही होते. एकदा मामांनीं भालदारामार्फत पटवर्धनांस कळविलें कीं, "तुमचें पथक कहीसमागमें (लष्कराची दाणावैरण आणणाऱ्या टोळीबरोबर) नेमिलें आहे, तरी कही संभाळून आणणें."

हें पोलीस-चौकीदाराचें साधें काम आपणाकडे दिलेलें पाहून पुरुषोत्तमराव संतापले. त्यांनीं उत्तर दिलें, "आमचें पथक कहीसमागमें जाणार नाहीं !" भालदार तो निरोप घेऊन दहावीस पावलें जाऊन माघारा आला व बोलला, "हे मानपान गोपाळरावदादा ह्यांजबरोबर गेले. आतां जी चाकरी सांगूं ती करून राहावें, असा मामांचा हुकूम आहे !"

दाजी बोलले, "अरे, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले—ज्या त्यांच्या भाऊबंदांनीं त्यांना प्राणपणानें साह्य केलें—ते जिवंत आहेत !"

भालदार गेल्यावर दाजी पालखींत बसून मामांकडे गेले. मामांनीं कहीबरोबर जाण्याची गोष्ट काढली. "हैदरखान ह्याचे बेदडे—लुटारू—चोहोंकडे फिरतात. कही निभावून येईनाशी जाहली. तुमच्यासारखें मातबर पथक पाठवून ती आली तर निभावेल !" दाजी बोलले, "हें खरें, पण तुम्ही शेवटीं निरोप सांगोन पाठविला. आपण कांहीं नवे आलों नाहीं. आपण हैदरखानाचे माणिक चौकांत (राज्याच्या मध्यभागीं) आहों. कोण मनुष्यें कशीं हें तुम्ही नजरेनें पाहातां. तुम्ही जुने माहितगार म्हणून उगेच बसलों, नाहीं तर चांगली शोभाच केली असती !" ह्याप्रमाणें तोंडावर बोलून लष्करांत परत आले. लष्करांतील सर्वांना सांगितलें "आम्ही जाऊन जें पाहिजे तें बोलून आलों. परंतु उद्यां प्रसंगास जर नांव राखलें तर बरें, नाहींपेक्षां पडलें काम करावें लागेल." हें ऐकून सर्वांनीं बेलभंडार घेतला जे, 'प्रसंगास आम्ही मागें सरणार नाहीं.'

पुढें मोती तलावाच्या लढाईत ( १७७१ ) हैदरखानाचा पूर्ण पराभव झाला, परंतु नीलकंठराव ह्या लढाईत एका अवघड कामगिरीवर असतां गोळी लागून ठार झाले. पुढें तेरावे दिवशीं त्रिंबकराव मामा समाचारास आले व बोलले, "नीलकंठराव आम्हांस टाकून वैकुंठास गेले."

पुरुषोत्तमराव बोलले, "अहो त्रिंबकराव ! कोणते लढाईस आमचा पुरुष पडला नाहीं अशी लढाईच नाहीं. दर लढाईस आमचा एक पुरुष खर्च होतो, तेव्हां श्रीमंत सरंजाम चालवितात ! आम्हीं शिरें हातांत घेतलीं आहेत. आम्हीं कांहीं नुसती सोयरीक जोडून रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाहीं !" असें म्हणतांच त्रिंबकराव मामा उमजले. त्यांनीं आपली चूक कबूल केली. "आपण सर्वांनीं मजवर कृपा करावी," असें म्हणून दाजींचा राग शांत केला.

अशा रीतीनें पुरुषोत्तमराव दाजी कोणाचीही भीडभाड ठेवीत नसत. सगळा रोखठोक व्यवहार !

....१०

## बारभाईचें कारस्थान



नारायणरावाचा वध झाला तेव्हां त्याची पत्नी गंगाबाई सती जाण्यास तयार झाली. परंतु ती गरोदर होती. त्यामुळें स्वतः आनंदीबाईनेंच तिला परतविलें. पुढें कारभारी सखारामबापू व इतर मुत्सद्दी रघुनाथरावानें केलेल्या ह्या दुष्कृत्यामुळें पुरे विटले होते. रघुनाथरावाकडे पेशवेपद असतां कामा नये, त्यास राज्यापासून बहिष्कृत करावें असें सर्वांनीं योजिलें. सखारामबापू, त्रिंबकराव मामा, नाना फडणीस, हरिपंत फडके व सरदार मंडळीपैकीं मालोजीराजे वगैरे बारा जणांनीं एकत्र येऊन वरील कारस्थान रचिलें. गरोदर गंगाबाईस पुरंदरास कैदेंत म्हणून ठेवावी. रघुनाथरावदादा ह्यास स्वारीस म्हणून पुण्याबाहेर काढावें, असा नक्की बेत झाला. त्याप्रमाणें बाराही जणांनीं आणाशपथा घेतल्या, बेलभंडार केला.

सखारामबापूंनीं रघुनाथरावास समजाविलें, "आतां आपला अंमल बसला. आपण येथेंच राहिलांत तर परराज्यांत जरब बसणार नाहीं. गंगाबाईस पुरंदरास अटकेंत ठेवावी." रघुनाथरावास तें पटलें. सर्व सरदार

मंडळींना स्वारीवर जाण्याविषयीं तयारी करून या अशीं पत्रें रवाना झालीं. पटवर्धन मंडळी पुण्याबाहेर होती. त्यांसही पत्रें गेलीं. पुरुषोत्तमराव दाजी मंगळवेढ्यास होते त्यांसही अगत्याचें पत्र गेलें. दाजींनीं परशुरामभाऊंच्या मातोश्रींस भेटून एक अट घातली, 'मी जें करीन तें भाऊंनीं व इतर पटवर्धन मंडळींनीं ऐकलें पाहिजे. नाहींपेक्षां पाणी प्यावयास देखील राहाणार नाहीं!' दाजींची ही अट सर्वांनीं मान्य केली. 'दाजी जितकें पाणी पिण्यास सांगतील तितकें पिऊं.' एवढी खबरदारी घेऊन दाजी, परशुरामभाऊ व त्यांचे दोघे चुलत बंधु ह्यांसह पुण्यास आले.

पटवर्धन मंडळीवर रघुनाथरावाचा पहिल्यापासूनच अविश्वास व द्वेष होता. तेव्हां पटवर्धनांनीं बेलभंडार घेऊन नंतर चाकरीस यावें असें रघुनाथरावानें बजाविलें. पटवर्धन त्रिवर्ग सरदार दाजींकडे बोट दाखवीत. नित्य कचेरीस दाजीच जात. त्रिवर्ग सरदार केव्हांतरी आठ पंधरा दिवशीं जात. रघुनाथरावदादा दर खेपेस तबकांत बेलभंडार ठेवीत. दाजी म्हणत, "आम्ही नवीन चाकरीस राहावयास आलों कीं काय? आम्हांस बेलभंडार कशाला पाहिजे?" एक दिवस जास्तच आग्रह पडला तेव्हां दाजींनीं विचार केला, "श्रीमंत नानासाहेब ह्यांचा जो वंश तो आम्हांस पूज्य. सर्व धनी ते. त्यांनीं त्यांचे वंशाशीं अनुचित गोष्ट केली त्यापेक्षां त्यांसीं आम्हांस बदमामली अवश्य करावयाची! श्रीमंत नानासाहेब ह्यांचे वंशाशीं नाहीं!" बेलभंडार उचलतांना मोघम उच्चार केला, "आम्ही पहिलेपासून सरकारचे चाकर. सरकारचे पायांशीं अंतर करणार नाहीं. एकनिष्ठपणें वर्तन करूं."

पण सरकार कोण ह्याचा उलगडा दाजींनीं मोघम ठेवला!

---

**बेलभंडार**—(भंडार–हळदीची पूड) देवावरील बेल व हळद उचलून घेतलेली शपथ, देवाची शपथ, आणभाक.

**बदमामली**—खोटा जावसाल, खोटेपणा, बेइमानी.

## .... १०
## बारभाईंचें कारस्थान



नारायणरावाचा वध झाला तेव्हां त्याची पत्नी गंगाबाई सती जाण्यास तयार झाली. परंतु ती गरोदर होती. त्यामुळें स्वत: आनंदीबाईनेंच तिला परतविलें. पुढें कारभारी सखारामबापू व इतर मुत्सद्दी रघुनाथरावानें केलेल्या ह्या दुष्कृत्यामुळें पुरे विटले होते. रघुनाथरावाकडे पेशवेपद असतां कामा नये, त्यास राज्यापासून बहिष्कृत करावें असें सर्वांनीं योजिलें. सखारामबापू, त्रिंबकराव मामा, नाना फडणीस, हरिपंत फडके व सरदार मंडळीपैकीं मालोजीराजे वगैरे बारा जणांनीं एकत्र येऊन वरील कारस्थान रचिलें. गरोदर गंगाबाईस पुरंदरास कैदेंत म्हणून ठेवावी. रघुनाथरावदादा ह्यास स्वारीस म्हणून पुण्याबाहेर काढावें, असा नक्की बेत झाला. त्याप्रमाणें बाराही जणांनीं आणाशपथा घेतल्या, बेलभंडार केला.

सखारामबापूंनीं रघुनाथरावास समजाविलें, "आतां आपला अंमल बसला. आपण येथेंच राहिलांत तर परराज्यांत जरब बसणार नाहीं. गंगाबाईस पुरंदरास अटकेंत ठेवावी." रघुनाथरावास तें पटलें. सर्व सरदार

मंडळींना स्वारीवर जाण्याविषयीं तयारी करून या अशीं पत्रें रवाना झालीं. पटवर्धन मंडळी पुण्याबाहेर होती. त्यांसही पत्रें गेलीं. पुरुषोत्तमराव दाजी मंगळवेढ्यास होते त्यांसही अगत्याचें पत्र गेलें. दाजींनीं परशुरामभाऊंच्या मातोश्रींस भेटून एक अट घातली, 'मी जें करीन तें भाऊंनीं व इतर पटवर्धन मंडळींनीं ऐकलें पाहिजे. नाहींपेक्षां पाणी प्यावयास देखील राहाणार नाहीं !' दाजींची ही अट सर्वांनीं मान्य केली. 'दाजी जितकें पाणी पिण्यास सांगतील तितकें पिऊं.' एवढी खबरदारी घेऊन दाजी, परशुरामभाऊ व त्यांचे दोघे चुलत बंधु ह्यांसह पुण्यास आले.

पटवर्धन मंडळीवर रघुनाथरावाचा पहिल्यापासूनच अविश्वास व द्वेष होता. तेव्हां पटवर्धनांनीं बेलभंडार घेऊन नंतर चाकरीस यावें असें रघुनाथरावानें बजाविलें. पटवर्धन त्रिवर्ग सरदार दाजींकडे बोट दाखवीत. नित्य कचेरीस दाजीच जात. त्रिवर्ग सरदार केव्हांतरी आठ पंधरा दिवशीं जात. रघुनाथरावदादा दर खेपेस तबकांत बेलभंडार ठेवीत. दाजी म्हणत, "आम्ही नवीन चाकरीस राहावयास आलों कीं काय ? आम्हांस बेलभंडार कशाला पाहिजे ?" एक दिवस जास्तच आग्रह पडला तेव्हां दाजींनीं विचार केला, "श्रीमंत नानासाहेब ह्यांचा जो वंश तो आम्हांस पूज्य. सर्व धनी ते. त्यांनीं त्यांचे वंशाशीं अनुचित गोष्ट केली त्यापेक्षां त्यांसीं आम्हांस बदमामली अवश्य करावयाची ! श्रीमंत नानासाहेब ह्यांचे वंशाशीं नाहीं !" बेलभंडार उचलतांना मोघम उच्चार केला, "आम्ही पहिलेपासून सरकारचे चाकर. सरकारचे पायांशीं अंतर करणार नाहीं. एकनिष्ठपणें वर्तन करूं."

पण सरकार कोण ह्याचा उलगडा दाजींनीं मोघम ठेवला !

---

**बेलभंडार**—(भंडार–हळदीची पूड) देवावरील बेल व हळद उचलून घेतलेली शपथ, देवाची शपथ, आणभाक.

**बदमामली**—खोटा जावसाल, खोटेपणा, बेइमानी.

....११

# दाजींवर विषप्रयोगाचे प्रयत्न



दाजींनीं बेलभंडार उचलल्यावर रघुनाथरावदादा व सरदार मंडळी हिंदुस्थानच्या स्वारीस निघाली. एके दिवशीं चार लोक आनंदीबाईजवळ जमून सांगूं लागले, "पटवर्धन मंडळीचा विश्वास धरूं नये. त्यांना आणि विशेषतः दाजींना दगा करावा. ते फार सावध." दादासाहेबांच्याही मनांत हें विष त्यांनीं कालविलें. उभयतां श्रीमंतांना हा सल्ला तेव्हांच पटला. तेव्हां भोजनास बोलावून विषप्रयोग करवावा अशी मसलत ठरली. पटवर्धन मंडळींनीं आगाऊच बंदोबस्त केला होता कीं, "आम्हीं कोंकणांत कुलदेवतेस जाण्याचा नवस केला होता. तों सरकारचें पत्र आलें, तेव्हां एक अडत केली कीं दर्शन घेतल्याखेरीज कोठें जेवावयास जावयाचें नाहीं." असें सांगून भोजनास जावयाचा बेत मुळांतच खोडून काढला.

दाजींचा नियम असा होता कीं सरकारचे विडे जरी आले तरी गोटास आणून पुरून टाकावे. विडा खावा असा आग्रह झाला तर दाजी सांगत, "महाराज, आमचा संप्रदाय पूर्वापार असा चालत आला आहे कीं

गोटांतील आमचे मानकऱ्यांस ह्यांतील विडे दिल्याखेरीज आम्हांस खातां नये. खाल्ले असें त्यांस समजल्यास ते प्रसंगीं दगा देतील." असें सांगून ते विडा खाण्याचें टाळीत.

एके दिवशीं मकर संक्रांत आली. सर्वांनीं सरकारांस तिळशर्करा दिली. पुरुषोत्तमराव दाजी आनंदीबाईंना तिळशर्करा देण्यास गेले. आनंदीबाईंनीं त्यांचें स्वागत करून त्यांस बसावयास पाट दिला. सोनेरी वर्ख लावलेली तिळशर्करा व हलवा एका ताटांत भरून तें ताट पुढें केलें. दाजींनीं तें ताट आपल्या शेल्यांत ओतून घेतलें. आनंदीबाईंनीं तिळशर्करा तेथेंच खाण्याविषयीं आग्रह केला. विड्यांप्रमाणें ह्याही वेळीं लष्करांतील मानकऱ्यांची सबब पुढें करून दाजी गोटास आले. सर्वांस सांगितलें, 'सरकारांतून तिळशर्करा आली आहे. सुंदर सोनेरी वर्खांत आहे. ज्यास मरावयाचें असेल त्यानें खावी!' असें म्हणून लष्करांतील कुत्र्यांपुढें टाकिली. त्यांनीं ती खातांच तीं गरगर फिरून लागलींच मेलीं. तेव्हां सर्वांची खात्री झाली कीं दाजी सांगत तेंच खरें!

एके दिवशीं दाजी दरबारास गेले तों संध्याकाळ झाली. आनंदीबाईनें तेथेंच संध्या करण्याचा आग्रह केला. तेव्हां डोळ्यांस समई जवळ सोसत नाहीं असें म्हणून स्वतः पाटपाणी लांब घेऊन बसले व पळी वाजवून ताम्हन भरून संध्या पुरी केली व लष्करांत आले आणि सांगितलें कीं, 'आज बाईसाहेबांनीं संध्येस ठेवून घेतलें. संध्या करून आलों.' सर्वांनीं विचारलें, 'आचमनाचें काय केलें?' नंतर झालेली सर्व हकीकत सांगितली.

ह्याप्रमाणें दाजींवर विषप्रयोगाचे इलाज बाईसाहेब करीत, परंतु ईश्वरी कृपेमुळें सारीं विघ्नें टळत.

---

अडत — अडथळा, अट.

....१२

# दाजींच्या वक्तृत्वाची व शौर्याची चमक



कोणे एके दिवशीं पुरुषोत्तमराव दरबारास गेले तों दादासाहेबांच्या मांडीस मांडी लावून मालोजीराव घोरपडे, पाटणकर वगैरे मानकरी, तसेंच श्रीमंतांनीं पालख्या – अब्दागिऱ्या वगैरे वतनें देऊन मानमरातबास चढविलेले सुमेरसिंग वगैरे गारदी हेही बसले होते. इतक्यांत हारतुऱ्यांच्या पाट्या आल्या. श्रीमंतांनीं प्रथम हारतुरे गारद्यांच्या अंगावर फेकले, नंतर मालोजीराव घोरपडे वगैरेंना देऊन पुरुषोत्तमरावांच्या अंगावर तुरा फेकला. तों दाजींनीं तुरा तसाच माघारा फेकून म्हटलें, "राजे, राजे, हारतुरा माघारा टाका!" असें म्हणतांच दरोबस्त मानकऱ्यांनीं हारतुरे माघारे टाकले. नंतर दाजी बोलले, "दादासाहेब, हे गारदी पायांचीं माणसें. हे मानकरी मांडीस मांडी लावून बसले असतां गारद्यांस हारतुरे अगोदर अशी चाल नानासाहेबांपासून नव्हती! दादासाहेब, श्रीमंत नारायणरावसाहेबांस गारद्यांनीं मारलें, त्या वेळेस हे मानकरी वाड्यांत असते तर पांच हजार गारदी ह्यांनीं कापून काढले असते!!" असें बोलतांच दादासाहेबांस हे

मानकरी दंगा करतील असें वाटलें. पुरुषोत्तमराव तल्वार हातांत घेऊन बोलले, "आपणास चमत्कार पाहावयाचा असल्यास अद्यापि का होईना!" असें म्हणतांच दादासाहेब कचेरींतून उठून आंत गेले. पुरुषोत्तमराव व मानकरी गटानें बाहेर पडले. गारदीही बाहेर आले. गारदी दाजीस मुजरा करून बोलले, "महाराज, आपली बरोबरी आम्हांस यावयाची नाहीं." तों दाजी गारद्यांस म्हणाले, "तुम्हांकडे काय आहे! हें श्रीमंतांनीं पाहावें. हे मानकरी श्रीमंतांच्या बरोबरीचे, तुम्ही किती थोर जाहलां तरी श्रीमंतांचे चाकर!" असें म्हणून गारद्यांच्याही तोंडावरून हात फिरविला! तों मालोजीराजे दाजींची पाठ थोपटून बोलले, "दाजी, तुला काय सांगूं! माझ्या अंगावर शेंपन्नास जखम परंतु हें बोलणें आमच्यानें व्हावयाचें नाहीं. आज आमची अब्रू तूं राखलीस!" दाजी बोलले, "राजे, आम्ही काय ब्राह्मण!"

राजे बोलले, "तूं वरकड बामणावाणी बामण नव्हेस. तूं बोलशील आणि प्रसंग पडल्यास मरूनही जाशील. माझी खातरजमा आहे!"

ह्याप्रमाणें दाजींचें वक्तृत्व व शूरत्व ह्याची खातरजमा मोठमोठ्या मानकऱ्यांना होती.

---

अब्दागिरी —( आफ्ताब–सूर्य, गिरफ्तन्–पकडणें ) राजे, सरदार वगैरे थोर लोकांच्या डोक्यावर धरावयाचें छत्र ( हा मान असे. )

.... १३

# छत्तीस महिने बारभाई युद्ध



प्रथम दादासाहेब स्वारीस निघाले तेव्हां नाना फडणीस प्रकृति बिघडली ह्या निमित्तानें परत येऊन पुण्यांत राहिले. नंतर स्वारींतून एक एक मंडळी - सखारामबापू, हरिपंत तात्या - सारे माघारे आले. त्रिंबकरावमामा, पटवर्धन वगैरे सरदार रघुनाथरावांनीं बेइमानी केली म्हणून त्यांच्या पाठीस लागले. निजामाशीं संधान बांधून दरकूच एक लाख रुपये कबूल करून बारभाईंनीं त्याला वश करून घेतलें. फौजेंत मुख्य त्रिंबकरावमामा, दुय्यम हरिपंत फडके होते. पुरंदरास गंगाबाईसाहेब गरोदर होत्या. तेथें सखारामबापू मुख्य व नाना फडणीस दुय्यम कारभारी म्हणून राहिले.

रघुनाथराव विरुद्ध बारभाई असें युद्ध छत्तीस महिने चाललें. पहिली लढाई श्रीक्षेत्र पंढरपूरनजीक कासेगांव येथील मैदानांत झाली. दादासाहेब ज्या मुक्कामावरून हालत तेथें बारभाईंच्या फौजा मुक्काम ठोकीत. पंढरपूर मुक्कामीं दादासाहेब गेले तेव्हां 'वेडी बया' म्हणून एक संतीण तेथें होती. ती जें सांगेल त्याप्रमाणें होत असे. तिला दादासाहेबांनीं प्रश्न विचारला.

तिनें 'जय होतो' म्हणून सांगितलें. त्या भरंवशावर त्यांनीं तेथें मुक्काम केला. हें समजल्यावर त्रिंबकरावमामांनीं पुरुषोत्तमरावदाजींस बोलावून 'दादासाहेब लढाई देण्याच्या बेतांत आहेत, तेव्हां परशुरामभाऊ वगैरेंस बोलावून लढाईस सिद्ध व्हा' असें सांगितलें.

दाजींनीं सल्ला दिला, "माझा मनसुबा ऐका. लढाई उदईक करावी. आज नको. आज आम्हांस वीस मैलांची मजल पडली. सारी गाळण उडाली. सारी फौज संध्याकाळीं जमा होईल. शिवाय हुजरातींत सारा फितुर जाहला आहे."

त्रिंबकरावमामा उतावळे व हट्टी. ते बोलले, "आजच लढाई करावयाची. फौज जमवा." दाजींना हें रुचलें नाहीं. ते बोलले, "जर आज गडबड कराल, तर हुजरात सारी फितली आहे. तुमच्याच मुसक्या बांधतील." मामांस क्रोधाचा आवेश फार. तेव्हां नाइलाजानें दाजी सरदार व सैनिक जमवायला गेले. जातांना त्यांनीं बजाविलें, "मी येईपर्यंत गडबड करूं नये."

दाजी आपल्या गोटांत येऊन सैन्याची जमवाजमव करून निघाले तों इकडे दादासाहेबांनीं 'वेडी बया' हिला अंबारींत घालून तिचा हत्ती पुढें करून चढाई केली. दुसरीकडून त्रिंबकरावमामा चालून गेले. लढाईस तोंड लागलें, तोंच पहिला फितुर होऊन मामा जखमी झाले व घोड्या-खालीं आले. तशाच त्यांच्या मुसक्या बांधल्या. त्यांची सारी फौज उधळली. दादासाहेबांची फौज लूट करीत पाठीस लागली ( मार्च १७७४ ).

पटवर्धनांची फौज जों तयार होऊन येते तों मामांच्या फौजेचा पळ पाहून हीही फौज उधळली. दाजींजवळ खासे खासे दोनचारशेंच लोक राहिले. दादासाहेबांच्या फौजेंत ओळख पटण्यासाठीं निंबाचे टाळे खोवले. दाजींनींही आपल्या फौजेंत तसेंच केलें व कोणीं विचारल्यास 'आपण दादासाहेबांकडलेच म्हणून सांगावें' असें सांगितलें.

पटवर्धनांची शिल्लक फौज एका बाजूस उभी, मध्यें एक कुंपण, त्याच्या पलीकडे सुमेरसिंग वगैरे गारदी अबदागिरी धरून उभे. परशुरामभाऊंनीं सुचविलें, "हे गारदी नारायणरावांचे मारेकरी व थोडेसेच आहेत. त्यांवर हल्ला करावा." तों दाजींनीं मनाई केली. दाजी म्हणाले, "भाऊ, तुला समजलें? आम्हीच शिपाई आणि त्यांनीं हातांत काय कांकणें भरलीं आहेत? आम्हांस धनी ना गोसावी. त्यांनीं त्या म्हाताऱ्याच्या मुसक्या बांधून टाकल्या तशा तुझ्या मुसक्या बांधतील. आतां आपली अब्रू बचावून निघून जाणें चांगलें."

परशुरामभाऊंनीं गारद्यांस आतांच मारावें असा आग्रह धरला. तेव्हां दाजींनीं त्यांस शेल्यास धरून मागें खेचलें व म्हटलें, "शिपाईगिरीच्या गोष्टी आम्हांस सांगतोस! त्या थेरड्यास धरून नेलें तसें तुला नेतील व आम्हांस मरावें लागेल किंवा पांढऱ्या कावळ्यांकडे जावें लागेल." असें म्हणतांच परशुरामभाऊ मागें फिरले व सर्वांनीं माण नदीवर मुक्काम केला. हरिपंत फडके व त्यांची फौज तेथें जमा झाली. दादासाहेब पंढरपुरावर उतरले. अशा रीतीनें दाजींच्या चतुराईनें व सूचक सावधपणामुळें मोठेंच गंडांतर टळलें.

---

**पांढऱ्या कावळ्याकडे जाणें**—(कावळा कधींच पांढरा नसतो, ह्या-वरून) देशांतर करून भीक मागणें.

.... १४

# पुरंदरास राखण कोणास ठेवावें ?



कासेगांवच्या लढाईंत त्रिंबकरावमामा धरले गेले ही बातमी घेऊन सांडणीस्वार पुरंदरास आला. गंगाबाई तेथेंच गरोदर होत्या. पुरंदरच्या दरवाजावर लहानशा बंगल्यांत सखारामबापू व नाना बसले होते. सखारामबापूंनीं दुर्बिण लावून पाहिली. सांडणीस्वार लष्करांतून येत आहे, परंतु मसलत बिघडलीशी दिसते, असें नानांस सांगितलें. सांडणीस्वार लखोटे घेऊन आला. लखोटे फोडून वाचले. वर्तमान ऐकून नानांची कंबर खचली; ते बोलले, " प्रथमग्रासीं मक्षिकापात ! " बापू बोलले, " हें राजकारण आहे, असे तरंग किती उठतील ! आपण इतक्यांत दम टाकल्यास पुढें कसें कराल ! ज्यापेक्षां हरिपंत जिवंत आहे त्यापेक्षां मसलत बिघडत नाहीं. तो पुन्हा राजकारण उभें करील. " ह्याप्रमाणें धीर देऊन नाना भोजनास उठत नव्हते ते उठविले.

कांहीं दिवसांनीं श्रीमंत माधवरावसाहेब जन्मास आले (१७७४). त्यांनीं बावीस वर्षें पेशवाई सांभाळली.

नुक्रम २९७७
विभाग का. वा. ३३
क्रमांक १९४२
नौं. दि. ३-४-६१

इकडे दादासाहेबांनीं निजामाला फितुर करण्याचा उद्योग आरंभिला. 'आपण बारभाईंस मिळूं नये, आम्हांस साह्य करावें, चौथाई मुलूख देतों' असें आपला वकील पाठवून सुचविलें. निजामानें तें कबूल केलें नाहीं. बारभाईंकडून दरकूच एक लक्ष रुपये ह्याप्रमाणें पांचपंचवीस लक्ष रुपये पावले. असें असतां ही गोष्ट बेइमानीची कशी होईल, असें निजामानें सांगून पाठविलें. शेवटीं आपण कोणाच्याच पक्षास मिळूं नये, आपण लक्ष रुपये दरकूच देऊं असें दादासाहेबांनीं वकिलामार्फत कारभारी रुकनुल्ला ह्याजकडे संधान बांधलें.

निजामाकडून सैन्याचें कूच करण्यांत दिरंगाई होऊं लागली. तेव्हां हरिपंत फडके स्वत: नबाबाच्या लष्कराकडे गेले. पंधरा दिवस सारखी रुकनुल्ला ह्याजपाशीं कूच करण्याविषयीं रदबदली चालविली. शेवटीं एका रात्रीं फार उशीरा कारभाऱ्याकडे हरिपंत गेले. कारभारी पलंगावर झोपले होते. हरिपंत पलंगाच्या खुरास धरून निजले. रुकनुल्ला जागा होऊन पाहातो तों हरिपंत तेथेंच. त्यांना जागें केलें. 'तुम्हीं माझी विनंती मान्य केली कीं मी निघालों,' असें हरिपंत निश्चयानें म्हणाले. रुकनुल्लानें तत्क्षणीं नबाबास चिठी लिहून हरिपंताचा निश्चय कळविला. नबाबानें ताबडतोब उत्तर देऊन कूच करण्याची आज्ञा केली. 'हरिपंत के खातर से छे कोस कूच करना.' कारभाऱ्यानें ती चिठी वाचून हरिपंतास 'उदईक कूच आहे' असें खात्रीपूर्वक सांगितलें. तेव्हां कुठें हरिपंत तेथून निघून आपल्या गोटांत आले. तों चार घटका पहांटेच्या रात्रीस नबाबाची कूचाची तोफ झाली. ही बातमी दादासाहेबांस कळतांच त्यांनीं आपलें सैन्य हालवून पलायन केलें. पुढें परशुरामभाऊस घेऊन हरिपंततात्या व सारी फौजसुद्धा नबाबाला सामोरी गेली. नबाबानें विचारलें, 'हरिपंत कुठें आहेत?' तों हरिपंत परशुरामभाऊच्या बाजूस साध्या पोषाखांत साध्या शिपायाप्रमाणें उभे होते. नबाबानें हरिपंतांच्या अकलेची फार तारीफ केली. 'ह्यानें बुद्धिबळाचा डाव टाकावा तसें केलें! दादासाहेब लढाई न देतां पळाले!'

हरिपंतांना मुलाखतीस बोलावून नबाबानें त्यांचा गौरव केला. नंतर बारभाई सरदार व नबाब आपापल्या मुक्कामास गेले.

नबाबास मेजवानी करावी असें ठरून नाना व सखारामबापू आले पाहिजेत म्हणून हरिपंत फडके ह्यांनीं पुरंदरास मुत्सद्दयांना लिहून पाठविलें.

अशा रीतीनें त्रिंबकरावमामांना दादासाहेबांनीं धरल्यामुळें झालेला पहिला अपशकुन हरिपंत फडक्यांनीं पुन्हा राजकारण उभें करून दूर केला व बिघडलेली मसलत सुधारली.

नबाबाला मेजवानी द्यायचें ठरलें. नाना आणि बापू ह्यांनीं पुरंदर सोडून दूर जायचें तर एक मोठी अडचण म्हणजे अशी कीं श्रीमंतांजवळ कोणास ठेवावें ? बापू बोलले, " ज्याला पुरंदरला श्रीमंतांजवळ राखण म्हणून ठेवायचें त्याचे अंगीं चार गुण अवश्य पाहिजेत. एक तर तो मातबर नामांकित मनुष्य पाहिजे. दुसरा गुण, तो विश्वासूक पाहिजे. तिसरा गुण, तो निःस्पृह पाहिजे. कोट रुपये मृत्तिकेसमान मानणारा पाहिजे. चौथा गुण, तो शिपाई मर्द माणूस पाहिजे. प्रसंगीं प्राणसमर्पण करणारा पाहिजे." असे चारी गुण संपूर्ण कोणांत आढळेनात. तेव्हां लष्करांत पत्र पाठवून पुरुषोत्तमरावदाजींस आणून ठेवण्याचें उभयतां मुत्सद्दयांनीं ठरविलें व तसें त्यांनीं पत्रही लिहिलें.

पत्र पोचतांच पुरुषोत्तमरावदाजी पुरंदरास आले. मुत्सद्दयांची मुलाखत झाली. दाजी बोलले, " हें पुरंदरच्या रखवालीचें काम सरदाराचें. मी सरकारचा एकांड्या शिपाई, लष्करांत फिरणार. पटवर्धन सरदार तिघे, त्यांपैकीं कोणास सांगावें." अशी टाळाटाळ केली. तेव्हां सखारामबापू बोलले, " आम्हीं सर्वांची चौकशी केली. कोणी शिपाई आहेत तेथें मसलत नाहीं. मसलत व शिपाईगिरी आहे तेथें विश्वास नाहीं. सर्व गुण आपलेपाशीं आहेत." भाऊच्या परवानगीची अट दाजींनीं पुढें केली. कारभाऱ्यांनीं भाऊचें पत्र आणविलें. 'दाजी वडील आहेत. ते आम्हांस आज्ञा करणार. सरकार त्यांस तेथें ठेवणार.' असें भाऊचें उत्तर आलें.

आतां कोठेंच सवड नाहीं असें पाहून दाजींनीं 'सारी मुखत्यारी जर मला सांगितली तर राहीन,' असें म्हटलें. कारभारी बोलले, "जसे आम्ही उभयतां त्याप्रमाणें आपण." किल्लेदार, खजिनदार व इतर सर्व दरकदारांच्या दाजींशीं रुजवाती करून झाल्या. प्रसंग पडल्यास दाजींच्या दिमतींत चारशें प्याद्यांची यादी करून दिली. अशी सर्व व्यवस्था लावून लष्करांत जातांना बापूंनीं सावधगिरीचा इषारा दिला, 'आम्ही लष्करास जातों. दादासाहेब पन्नास हजार फौज घेऊन बाहेर फिरताहेत. श्रीमंतांस सांभाळावें.'

दाजी बोलले, "हें सारें माझ्या पोटांत गडबडत आहे! सरकारसेवेंत दहा वर्षांपासून – आज पंचेचाळीस वर्षें वयास झालीं – आजपर्यंत वागलों. हे चारशें प्यादे व मी स्वत: प्राण अर्पीन पण श्रीमंतांचें रक्षण करीन." बापू बोलले, "तुम्हांविषयीं माझी खातरजमा आहे."

कारभारी लष्करास चालते झाले. दाजी श्रीमंतांजवळ पुरंदरास राहिले. गंगाबाईसाहेबांनीं दाजींस आपल्या वडील बंधूप्रमाणें मानलें. दाजींनीं ढाल–तलवार घेऊन खोलीच्या दारांत निजावें. चौकी पहारा पाहात सारी रात्र फिरत असावें.

कारभारी लष्करास गेले. निजामास मेजवानी झाली. तेव्हां नबाबानें विचारलें, "तुम्ही उभयतां आलां व रावपंडत के पास कोण आहे?"

"पुरुषोत्तमराव पटवर्धन ह्यांस ठेविलें आहे" असें सांगतांच, "ते आम्हांस माहीत आहेत. चांगले योग्य मनुष्य आहेत" असें नबाब बोलला. पटवर्धनांची चौकी विश्वासाची ही कीर्ति नबाबापावेतों पसरली होती.

....१५

# स्वामिभक्त दाजींचा चौकी पहारा



दाजी अत्यंत धूर्त व सावध असत. त्याना मनुष्याची योग्य पारख करतां येई. पुरंदरास येण्यापूर्वीची ही गोष्ट आहे. दाजी एका दिवशीं मौजे आंबें परगणे मंगळवेढें येथें किल्ला बांधण्याचें काम चाललें होतें तेथें गेले. तेथें त्यांचा चार दिवस मुक्काम होता. त्या भागांत निरंजन अय्या नामक एक जंगम राहात असे. तो आंब्यास आला व दाजींपाशीं फारच आर्जवानें पुढें पुढें करूं लागला. एकदा दाजी भीमेस स्नानास गेले तेथें सोन्यांत गांठविलेली रुद्राक्षांची माळ पुढें ठेवून जंगम दाजींस बोलला, "ही माळ आपण घ्यावी." तेव्हां हे जप करीत होते, कांहीं बोलले नाहींत. माघारे येतेवेळेस त्यांनीं सांगितलें, "आम्हांस ही माळ नको." भोजनोत्तर मंगळवेढ्यास जातेवेळीं दाजींनीं पाटलास बोलावून ताकीद दिली कीं, "हा जंगम जर पुन्हा गांवांत आला तर तुझें डोचकें फोडीन! हा चोर आहे." आठपंधरा दिवशीं पंढरपुरीं दरोडा पडला त्यांत हा जंगम सापडला. तेव्हां त्यास पायांत बेड्या घालून मिरजेस बंदींत टाकला.

अशा प्रकारें दाजींस माणसाची योग्य पारख करतां येई. त्याचा उपयोग पुरंदरास फारच झाला.

कारभारी लष्करांत जाऊन महिना पंधरा दिवस झाल्यावर शागीर्दपेशाचीं माणसें व खाजगीकडील माणसें ह्यांचे पगार थकलेले होते त्यांचा फडशा दाजींकडून करवावा अशी निकड त्या माणसांनीं गंगाबाईसाहेबांकडे केली. गंगाबाईसाहेबांनीं ती गोष्ट दाजींच्या कानांवर घातली. दाजींनीं दोन तीन वेळां ऐकलें न ऐकलेंसें केलें. ते म्हणत, " बाईसाहेब, आमचा कारभार औट घटकेचा. जसा साडेतीन घटकेचा शिराळशेटीचा राजा. उद्यां नाना आले म्हणजे ते हवें तें करोत !", तरीसुद्धा बाईसाहेबांनीं गोष्ट काढली तेव्हां बरें म्हणून खजिनदार बिवलकर ह्यांस हाक मारली व थकबाकी-विषयीं विचारलें. दाजी म्हणाले, " ह्या माणसांपासून आम्ही काम करून घेणार. न केल्यास पायपोसानें मारणार. तुमचा तीन पिढ्यांचा नोकर असला तरी सोडणार नाहीं."

खजिनदार बोलले, " मी एकदा सांगेन, ह्या कामांत आपण पडों नये. नाना आल्यावर पाहातील."

ह्यावर दाजी बोलले, " तुम्ही सांगतां हें खरेंच, पण माझ्या गळ्यांत ही गोणी घालून नाना आणि बापू लष्करांत गेले. शागीर्दपेशा वगैरे खाजगीचीं माणसें ह्यांत खिचडी आहे. कांहीं इकडे आहेत, कांहीं दादासाहेबांकडचीं आहेत. उद्यां पैका खाऊन जर हे फितले तर बरेंवाईट झाल्यास मला प्राण द्यावा लागेल. तेव्हां निक्षून सांगतों कीं हिशेब करून पगारबाकी चुकती करणें."

आठ-पंधरा दिवसांत सर्व हिशेब पुरे करून खजिनदारानें पाऊण लक्ष रुपयांची यादी तयार केली. दाजींनीं मखलाशी – हिशेब मंजूर केल्याचा शेरा – करून ' देणें ' केलें आणि रोजमजुरा दरोबस्त वांटला ! सारीं मनुष्यें संतुष्ट झालीं व नीट नोकरी करूं लागलीं.

मागें पगाराच्या थकबाकीचीच सबब पुढें करून सुमेरसिंग वगैरे गारद्यांनीं गिल्ला केला होता व नारायणरावाचा खून पाडला होता! ह्या प्रसंगीं इतिहासाची पुनरावृत्ति न व्हावी म्हणून दाजींनीं नानांचा संभाव्य भावी रोष पत्करूनही केलेल्या ह्या बंदोबस्ताची तारीफ करावी तेवढी थोडीच! तत्कालीन राजकारणांत फंदफितुरीला फार ऊत आला होता. एके दिवशीं दोन प्रहरीं दाजी खोलीच्या दारांत निजले होते. तों नित्य जाणारी कुणबीण आंत जात होती. दाजींची चाल अशी होती कीं, नित्य माणसें आंत जाणार त्यांचा झाडा घेऊन नंतर आंत जाऊं द्यावीं. तों कुणबीण आंत चाललेली पाहून दाजी बोलले, "रांड फितुरी आहे, धरा!" दुसऱ्या कुणबिणी आणून लुगड्यासुद्धा झाडा घेतला. नंतर वेणी सोडविली तों बुचड्यांत सुरी निघाली! चौकशीवरून फितुरी सिद्ध होतांच भोतांत घालून कडेलोट करून दिला.

ह्याप्रमाणें दाजींची धूर्तता बहुत होती. कांहीं दिवसांनीं नाना व बापू लष्करांतून पुरंदरास आले.

---

**जंगम** — शिवपूजक, लिंगाईत लोकांचा गुरु.

**भोत** — गोणपाटाची पिशवी, पोतें.

.... १६

# दादासाहेबांचा बंदोबस्त



बारभाईनीं हरिपंततात्यासमागमें फौज देऊन पटवर्धन परशुरामभाऊ, इतर मानकरी व नबाबाची फौजसुद्धा दादासाहेब ह्यांच्या पिछाडीवर रवाना केली. दादासाहेबांनीं इंग्रजांचा आश्रय केला. नापार येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली. इंग्रजांचीं दोन पलटणें नदी उतरून आलेलीं पाहातांच अलीबक्ष व ऐरावत ह्या पेशवे सरकारच्या दोन हत्तींवरील बाबा महात व दावल महात ह्यांनीं मसलत करून तीं पलटणें हत्ती घालून तुडवून मारून टाकावीं असें ठरविलें. तेव्हां चोहोंकडून पलटणांवर घोडीं घातलीं. मालोजीराजे बोलले, "अरे काय पाहातां! तें फडकें (जरीपटका) गेलें म्हणजे आमची अब्रू गेली." जरीपटका निशाण पुढें चालून जाणाऱ्या एका हत्तीवर होतें. हत्ती पलटणींत जाऊन मिसळले. तेव्हां हत्तीच्या सोंडेंत पट्टे दिले. दोन्ही पलटणें कापून काढलीं. तेव्हां कर्नल कीटिंगनें दुर्बिणींतून पाहिलें व म्हटलें, "आमचीं पलटणें म्हणजे दारूची आग. त्यांजवर मुकीं जनावरें ज्यापेक्षां चालून येऊन त्यांनीं पलटणें मारलीं

त्यापेक्षां हें राज्य आम्हांस येत नाहीं!" तेव्हां दादासाहेब बोलले, "हीं माझीं माणसें अशींच आहेत! मी घरभांडणामुळें तुमचे पाठीशीं पडलों."

ह्याच नापारच्या लढाईंत दोनही सैन्यांच्या गांठी पडल्या तेव्हां दादासाहेब अंबारींत होते. तेव्हां पेशव्यांच्या सैन्यांतील कोणीतरी बोलला, 'दादासाहेब ह्यांस मारावा.' तेव्हां पेशव्यांचा नामांकित गोलंदाज सय्यद हुसेन हा बोलला, 'ते धनी आहेत. त्यांस कसें मारावें? परंतु माझी शिस्त पाहावी.' असें म्हणून तोफेच्या गोळ्यानें अंबारीचा कळस उडविला. हें पाहून दादासाहेब इंग्रजांस बोलले, 'मी व्यर्थ तुमचे पाठीशीं पडलों. अरे, ज्यानें अंबारीचा कळस सफाईदार उडविला त्यास माझा प्राण घ्यावयास उशीर लागेल कीं काय?" तेव्हां इंग्रजांनीं मनगटें चावलीं. मातबर लढाई झाली. सरळ तोफेवर जाऊन गोलंदाजाचा गळा कापून नेला.


ह्याप्रमाणें लढाया मातबर होऊन दादासाहेबांस कोठें चैन पडूं देईनात. शेवटीं सालबाईचा तह (स. १७८३) होऊन दादासाहेबांस इंग्रजांचा आश्रय नाहींसा झाला. तेव्हां खर्चाच्या सोयीची लेखी हमी घेऊन दादासाहेब गोदातीरीं कोपरगांवीं येऊन 'हरि हरि' म्हणत स्वस्थ बसले. हरिपंत फडके त्यांस घेऊन कोपरगांवीं आले. त्यांस दादासाहेब बोलले, 'तुम्हीं आम्हांस बरे धुळीचे दिवे दाखविले." हरिपंतांनीं उत्तर केलें, "ह्याचें उत्तर आम्हीं सेवकांनीं काय द्यावें? आपण श्रीमंत रावसाहेब ह्यांस विचारावें. ते आपणांस सांगतील."

अशा रीतीनें ३६ महिने चाललेल्या बारभाई विरुद्ध दादासाहेब ह्या गृहकलहाचा शेवट झाला.

सुमेरसिंग गारदी व तुळाजी पवार फिरंग्यांच्या राज्यांत पळून गेले होते. त्यांस तेथून आणून त्यांस व त्यांच्या साथीदारांस देहान्त शिक्षा दिली. नारायणरावाच्या खुन्यांची अशा रीतीनें बारभाईनीं व्यवस्था लावून पुन्हा पेशवाईची स्थिरस्थावर केली.

इकडे उभयतां कारभारी पुरंदरास आले. खजिनदार विवलकर ह्यांनीं खर्चाच्या कीर्दी नेऊन दाखविल्या. नेबाद वाटले ती बेरीज मोठी पाहून नानांनीं विचारलें; त्यांनीं पुरुषोत्तमरावांकडे बोट दाखविलें. पुरुषोत्तम-रावांना बोलावून विचारलें. दाजी बोलले, "बहुरूप (भोरीप) नाचविलें कीं काय? अहो, तुम्हीं माझे डोचकीवर ओझें ठेवलें. आणि हीं सरकारचीं माणसें तिकडील पैका खाऊन जर फितलीं असतीं तर मला प्राण द्यावा लागता!" असें म्हणतांच सखारामबापूंनीं 'योग्य केलें' असें म्हटलें. नंतर नाना कांहीं बोलले नाहींत व तें पाऊण लाखाचें प्रकरण तेवढ्यावर मिटलें. पेशव्यांच्या शरीररक्षणाचें – पलंगचौकीचें – काम दाजींकडे जसें होतें तसेंच पुढें चालू राहिलें.

## ....१७ जसे उभयतां कारभारी तसे दाजी



एके दिवशीं दाजी पुरंदराखालीं भिवडी गांवीं पागा व बारगीर ह्यांची पाहाणी करण्यासाठीं गेले होते. कारभारी पुरंदरास परत आल्यावर फार दिवसांनीं दाजींना

तेथील घोडीं वगैरेंची पाहाणी करण्याची संधि मिळाली. परत पालखींतून येत असतां किल्ल्याच्या दरवाजांत ' परमाणगी पाहिजे ' असें नवीनच नेमलेल्या दरवाजकऱ्यानें विचारलें व दाजींना अडविलें. तेव्हां ते तसेच फिरून आपल्या राहुटीस परतले. नानांस हें समजतांच त्यांनीं स्वतः स्वदस्तूरची चिठी दाजींस लिहिली : ' काल आपण माचीस येऊन श्रीमंत माधवरावसाहेब ह्यांजवर रागें भरून गेलां, त्यास दरवाजावरचा कारकून कालच बदलला. राग टाकून यावें. नाहीं तर आपली आज्ञा जाहलियास मीच आपले राहुटीस येईन ! ' ह्याप्रमाणें मनधरणीची चिठी येतांच दाजी किल्ल्यावर गेले. नाना भेटतांच दाजी बोलले, **" नाना, मला श्रीमंतांचे घरीं तीन पिढ्या परमाणगी म्हणून नाहीं. ह्याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासून चाललें. "**

नाना बोलले, " आतां तरी आपणांस आडकाठी कोठें आहे ? "

त्या दिवसापासून जसे उभयतां कारभारी त्याप्रमाणें दाजी. सरकारवाड्यांत श्रीमंतांच्या दर्शनास कोणी आल्यास नाना दाजींस चिठी लिहीत व दाजीमार्फत श्रीमंतांची भेट होई.

---

**माची** — ( किल्ल्याच्या ) तटाखालील उताराचा भाग.

.... १८

# दाजींचें पुरंदरीं सहकुटुंब सहपरिवार वास्तव्य



श्रीमंतांच्या पलंगचौकीचें काम दाजी करीत. श्रीमंतांचें वय लहान म्हणून दाजींना घरीं जाण्यास निरोप व्हावयाचा नाहीं हें जाणून श्रीमंत गंगाबाईसाहेब ह्यांनीं दाजींना कुटुंब पुरंदरीं आणण्याचा आग्रह केला. तेव्हां त्यांनीं मंगळवेढ्याहून कुटुंब आणविलें.

दाजींना पुत्र चार, कन्या दोघी. वडील पुत्र हरिहरराव, वय १२ वर्षांचें. ह्या मुलास दाजी आपल्याबरोबर दरबारांत नेत. हें सर्व कुटुंब जेवणखाण निराळें करीत. शिधासामुग्री वाड्यांतून मिळे. आठचार दिवशीं दाजी व हरिहरराव श्रीमंतांकडे जेवावयास जात. एखादे दिवशीं दाजींच्या कुटुंबास श्रीमंत गंगाबाईसाहेब बोलावून नेत. दाजींच्या कुटुंबाचें नांव कृष्णाबाई – त्यांस ' आई ' म्हणत. श्रीमंतांकडे जातांना ' आई ' आपल्या सहा-सात महिन्यांच्या मुलीला – सगुणाबाई ऊर्फ बयो – हिला बरोबर नेत. ही मुलगी रूपानें सुंदर होती. तेव्हां श्रीमंत बाईसाहेब म्हणत, " तुमची गोजरी आमचे बाळास करावयाची ! "

ह्यावर दाजी बोलत, " महाराज, आम्ही पदरचे चाकर. आमची योग्यता मुलगी द्यावयाची आहे कीं काय? आम्हीं कण्या-भाकरी खाणार गरीब ! "

श्रीमंतांनीं म्हणावें, " काय हें दाजी ! कण्या-भाकरी म्हणजें काय? "

दाजींनीं बोलावें, " आम्हांला कण्या-भाकरीचा मुलुख दिला. त्या मुलुखांत दुसरें धान्यच नाहीं. " असें म्हणतांच त्यांनीं हसावें. ह्याप्रमाणें थट्टाविनोद चाले. असो. दाजींनीं आपल्या कुटुंबास श्रीमंतांचें घर आपल्या घराप्रमाणें केलें होतें.

.... १९

## सारे माझ्या ओळखीचे आहेत !



मानाजी फांकडे नांवाचे एक शिलेदार शिपाईगिरीमध्यें पटाईत होते. इतर कांहीं शिलेदारांप्रमाणें तेही कांहीं काळ रघुनाथरावांच्या पक्षास होते. १७७६ सालीं तो पक्ष सोडून ते पुण्यास आले. तेथून पुरंदरास श्रीमंतांच्या भेटीस येण्याचें त्यांनीं ठरविलें. तेव्हां सर्व मुत्सद्द्यांस भय वाटूं लागलें. ते

मानाजीस फितूर समजत. अशा प्रसंगीं नाना दाजींस बोलले, “ मानाजी-बरोबर बोलावयाचा आपला कांहीं लाग नाहीं. त्याजबरोबर आपणच बोलावें. ”

दाजी बोलले, “ तुमचा पंचहत्यारी कसलाही जरी आला तरीही मी त्याजबरोबर बोलतों. सारे माझ्या ओळखीचे आहेत. ”

नंतर दाजी श्रीमंतांस कचेरीस आणावयास गेले, त्या वेळीं बाईसाहेबांनीं ‘ बाळास सांभाळावें ’ असें सांगितलें. दाजींनीं उत्तर केलें, “ बाईसाहेब, आपण कांहीं काळजी करूं नये. पुरुषोत्तमराव जिवंत आहे तों कोणाचें भय नाहीं. ”

श्रीमंतांस कडेवर घेऊन दाजी कचेरीस आले. त्यांना मसनदीवर बसवून शेजारीं तलवार घेऊन दाजी बसले. नाना, सखारामबापू सारे मानकरी झाडून बसले. पाठीवर दोन पदर लोंबत असलेले अक्कडबाज फेटा बांधलेले मानाजीराव बरोबर २५–३० खासे सरदारगडी घेऊन दरबारांत ऐटीनें आले, ते थेट मसनदीजवळ येऊन बसले.

पुरुषोत्तमराव बोलले, “ रावसाहेब, मानाजीरावांस ताजीम द्यावी. ” असें म्हणतांच श्रीमंतांचे मसनदीवर खुरनिसा करून व चोहोंकडे पाहून मानाजी बोलले, “ दाजी, राम राम ! ”

दाजी बोलले, “ मानाजीबाबा, राम राम ! ” ह्यानंतर मानाजीनें इतर कोणासही राम राम न करतां बोलावयास प्रारंभ केला, “ पुरुषोत्तमराव, मी कसा आहें तो आपले तोंडानें वर्णन करावेंसें नाहीं. परंतु मला हीं बामणें फितुरी म्हणतात. त्यास आम्हांस कोठेंही चाकरी करावयाची. दादासाहेब काय आणि हे पाय काय, ह्यास आतां पुरे. आम्हीं जलमतांच दाली बांधून आलों नाहीं. ह्यांनीं आम्हांस दाली बांधिली. ” असें म्हणून गळ्यांतून पडदळसुद्धा तलवार काढून श्रीमंतांच्या पायांपुढें ठेविली. हें पाहातांच नानांनीं दाजींस खुणेनें सुचविलें कीं ह्यास आतां लवकर जावयाचें करा.

दाजी बोलले, " मानाजीबाबा, हें काय करतां? तुम्हांस दाली बांधली ती माघारी घ्यावयास बांधली कीं काय? तुम्हांला फितुरी तरी म्हणतो कोण? तुम्हीं आपला सरंजाम खाऊन श्रीमंतांचे पायांशीं लक्ष ठेवून स्वस्थ असावें."

असें म्हणतांच मानाजीबाबा बोलले, " आजपर्यंत चाकरी कशी केली ती आपणास माहीत आहेच." दाजींनीं रावसाहेबांकडून हात लावून तलवार मानाजीरावांस उचलून दिली. त्यांस व सर्वांस विडे देवविले. श्रीमंतांस उठावयाची खूण करतांच ते उठले. तों मानाजी मुजरा करून निघाले. दाजींनीं त्यांस निरोप दिला. ते गेल्यावर सर्वांचा जीव भांड्यांत पडला. नाना दाजींस बोलले, " दाजी, आज आपण होतां म्हणून मानाजीशीं बोललां. अहो कचेरींत म्हणतो, हीं बामणें मला फितुरी म्हणतात. त्यासी काय बोलावें?"

---

**मसनद** — गादी, सिंहासन.

**ताजीम** — सलामी, रामराम करणें.

**खुरनिसा** — ( तुर्की – कोर्निशात् ) नम्रपणानें केलेला सलाम, प्रणिपात.

**जलमतांच** — जन्मतांच.

**दाली बांधणें** — ( दाली – तलवार अडकविण्याचा कमरपट्टा ) वरिष्ठानें कनिष्ठाच्या कमरेस कमरपट्ट्यासह तलवार बांधणें, जहागीर देणें.

**पडदळ** — दाली, तलवार अडकविण्याचा कमरपट्टा.

## .... २०

## मी असें बोलून घ्यायचा नाहीं !



कारभारी सखारामबापू व नाना फडणीस नित्य तिसरे प्रहरीं श्रीमंत गंगाबाईसाहेब व श्रीमंत पार्वतीबाईसाहेब ह्यांजकडे येऊन बसत. त्या वेळीं कांहीं राजकारणी गोष्टी व खलबतें चालत. गंगाबाईसाहेब त्या वेळीं दाजींस बोलावीत. तेव्हां कारभाऱ्यांस संकोच वाटे. तेव्हां सखारामबापू ह्यांनीं आपल्या कारकुनास सुचविलें, "तुमचा नि दाजींचा ऋणानुबंध फार, तेव्हां खुबीनें दाजींस सुचवावें कीं आम्ही खलबतास बसलों असतां दाजींनीं तेथें न यावें."

पुरुषोत्तमराव दाजी तोतयास अनुकूल आहे असा अंधुक संशय कित्येकांस आला होता. ही गोष्ट दाजींच्याही कानांवर आली होती. म्हणून खलबताच्या वेळीं दाजी तेथें नसावे असें सखारामबापूंस वाटत होतें.

तेव्हां कारकून बापूंस म्हणाले, "बापू, आपण सांगतां तेव्हां निरोप कळवीन. परंतु दाजींचा स्वभाव रागीट. ते कांहीं बुद्धया कोणाच्या

बोलण्यांत शिरावयाचे नाहींत. तुम्हीं आग्रहानें ठेवून घेतलें म्हणून राहिले. त्यांस निरोप कळविल्यावर पुढें काय होईल तें मात्र मला विचारूं नये."

सखारामबापूनें निरोप कळविण्यास सांगितलें. कारकून दुसऱ्या दिवशीं दुपारीं दाजींकडे गेले. शिव्या देणार नाहीं असें वचन दाजींकडून घेतलें. नंतर त्यांस, कारभारी खलबत करतात तेथें आपण कशास जातां, त्यांस संकोच वाटतो, असें सुचविलें.

इतकें म्हणतांच दाजी बोलले, "अरे, तुला हें बोलावयास सखारामबापूनें सांगितलें असेल! सखारामबापूंना मी पुरें ओळखतों. आतां काय होणें तें कचेरीसच होईल. आतां तूं जा."

मग तिसरे प्रहरीं दाजी वाड्यांत गेले. तों श्रीमंत कचेरीस बसले होते. दाजींचा नित्य संप्रदाय श्रीमंतांस नमस्कार करून मसनदीजवळ बसावें. नंतर बाईसाहेबांचा निरोप यावा, आंत जावें. तेथें कारभारी बसलेले असत. त्या दिवशीं सखारामबापूंचा निरोप माहीत नसल्यामुळें बाईसाहेबांचा आंतून निरोप आला. बाहेर कचेरी, कारभारी माजघरांत, मध्यें पडदी मात्र. बाहेरूनच दाजी बोलले, "अहो, आम्हांस आंत जावयाची गरज नाहीं. आंत कारभारी राजकारणीं बोलणें करतात. बाईसाहेब आज्ञा करतात, सबब जावयाचें, परंतु कारभारी ह्यांस संकोच होतो."

नंतर कचेरीचे मानकऱ्यांस उद्देशून दाजी बोलले, "श्रीमंतांचे घरीं मुख्य दिवाण पुरंदरे. त्यांचे सखारामबापू हे कारकून. हे चांगले शहाणे सबब पुढें आले. परंतु तुम्हांला एक सांगतों. ह्यांनीं मागें बहुत चाळे केले. तेव्हांचे श्रीमंत थोर सूज्ञ होते. त्या वेळेस अब्रू राहिली. हल्लीं हे पाय — सवाई माधवराव — आहेत. आणि तुम्हां-आम्हांसारखे चाकर श्रीमंतांचे पदरीं बहुत आहेत. आतां सखारामबापू ह्यांनीं चाळे करावे, पुरुषोत्तमराव पारिपत्य करील." ह्याप्रमाणें दोनतीन वेळां छातीस हात लावून दाजी बोलले. त्यांचें सारें बोलणें आंत कारभारी ऐकत होतेच.


नंतर दाजींच्या तोंडाचा पट्टा चालूच राहिला. "माझे वयास ४८ वर्षें झालीं, परंतु मला कोणीं श्रीमंतांचे घरीं बोललें नाहीं. माझी मर्जी रक्षण करीत. **असें तीन पिढ्या चाललें.** हल्लीं ह्या कारभाऱ्यांचें बोलून घेऊन मला येथें राहावयाचें नाहीं. ह्यास्तव आज मी निरोपासच आलों." असें दाजी बोलले.

नाना आणि बापू ह्यांची कुजबूज सुरू झाली. बाईसाहेबही दाजींस पुन्हा निरोप पाठवीनात. तेव्हां बापू मुकाट्यानें उठून घरीं निघून गेले. नाना बाहेर आले व दाजींस 'नमस्कार' असें बोलले. दाजींनीं उत्तर केलें, "तुम्ही कारभारीच आहां! आज ते बोलले, उद्यां तुम्ही बोलणार! त्यास मी असें बोलून घ्यावयाचा गृहस्थ नाहीं. मी श्रीमंतांचा निरोप घेऊन घरास जाणार. मला घर सोडून फार दिवस जाहले." "श्रीमंत निरोप देतील तेव्हां जावें," अशी समजूत घालून हात धरून नानांनीं दाजींस बाईसाहेबांकडे नेलें. बाईसाहेबांनींही तसेंच बोलून दाजींस आग्रहानें ठेवून घेतलें.

तात्पर्य, पुरुषोत्तमरावदाजींप्रमाणें पराक्रम व बोलणें कोणाचेंच नाहीं! नाना फडणीसही आर्जवानें बोलून दाजींची मर्जी रक्षण करीत.

## ....२१

# नाना आणि दाजी



बोलावणें आल्याशिवाय दाजी कारभाऱ्यांच्या घरीं केव्हांही भेटावयास जात नसत. त्यांची भेट सरकारवाड्यांत नित्य पडे व तेथेंच नमस्कार-चमत्कार घडे. दाजींनीं ही प्रथा केव्हांही मोडली नाहीं. एके दिवशीं नानांचें बोलावणें आलें म्हणून दाजी आपल्या मुलास घेऊन त्यांच्या घरीं गेले. तों नानांचा खिसमतगार ह्यानें दाजी आले आहेत असें नानांस कळविलें. नाना कोणा गृहस्थाबरोबर खलबत करीत होते. दाजींना युक्तीनें अंमळ बाहेर थांबव म्हणून त्याला सांगितलें. "आपण अंमळ बाहेर बसावें" असें त्यानें दाजींस सुचवितांच दाजी बोलले, "अरे, मी कोणाचे दारीं आजपर्यंत बसलों नाहीं!" असें म्हणून जोडा घालून चौकांत आले. तों नाना फडणीस बाहेर येऊन हात धरून दाजींस माघारें नेलें. दाजी बोलले, "नाना, माझा संप्रदाय आपणांस माहीत असतां असें करतां हें काय? मी दारोदार बसावयाचा गृहस्थ नव्हे! मी श्रीमंतांचे दारींदेखील बसलों नाहीं. ह्याप्रमाणें नानासाहेब ह्यांपासून तीन पिढ्या

जाहलें, चाललें. आतां लोकांचे घरीं बसावयास मला फार दिवस कांहीं वांचावयाचें नाहीं. आपणांस कामें असल्यास मला बोलावणें पाठवीत जाऊं नये."

नाना कांहीं बोलले नाहींत. मग गप्पागोष्टी झाल्यावर नानांनीं पितापुत्रांस आग्रहानें जेवावयास राहवून घेतलें. भोजनोत्तर दोघेही घरीं आले.

दाजींनीं एकदा नानांस आपल्या घरीं भोजनास बोलाविलें. नानांचा संप्रदाय भोजनास जावयाचें तेथें आपल्या आचाऱ्याकडून स्वयंपाक करवीत, परंतु दाजींच्या घरीं आचारी पाठवावयाचा नाहीं. नाना भोजनास आले. त्यांच्या घरीं स्नान केलें, तों दाजी सोवळ्यांत घातलेलें चारबोटी रेशीमकांठी बारीक तलम धोतर चुण्या करून स्वतः हातांत घेऊन उभे! नानांचा शिष्य नित्याप्रमाणें नानांचीं धोतरें घेऊन उभा होताच! दाजींनीं नानांस सांगितलें, "इतका उंची धोतरजोडा आमचे मेव्हण्यांनीं माझेसाठीं पाठविला, परंतु एवढा मी कांहीं नेसत नाहीं, आपणांस चांगला आहे." हें ऐकून नाना तें धोतर नेसले व जेवावयास बसले.

पटवर्धन ह्यांच्या घरीं बायकांनीं जेवण वाढावयाचें असा शिरस्ता असे. नाना बोलले, "दाजी, ही कसली तुमची वेडी चाल बायकांनीं वाढावयाची?" दाजी बोलले, "आमच्या शिलेदारांच्या बायका सारीं कामें करतात!" तेव्हां नाना हसूं लागले.

पुढें जेवणें झालीं. विडे घेऊन नाना घरास गेले.

दाजी पुरंदरास असतां एकदा लग्नसमारंभाच्या निमित्तानें नानांस मेजवानी झाली. त्या दिवशीं दाजींनीं आचाऱ्यास सांगून शुद्ध भगवतीची (तिखटाची) पूड वस्त्रगाळ करवून सार करविलें व तें रुप्याच्या पातेल्यांत घालून इतरांना थोडथोडें व नानांस जास्त वाढण्यास सांगितलें. आचाऱ्यांनीं तसें वाढलें. नानांना तें द्राक्षांचें सार वाटून भुरका पांची बोटांचा मारला तों तोंडाची आग झाली. तोंड तसेंच पसरून नाना बोलले, "दाजी, तिखट लागलें!" असें म्हणतांच दाजी आचाऱ्यांस शिव्या देऊं लागले, "हे

हरामखोर दररोज आम्हांस असेंच तिखट घालतात! हे वडिलोपार्जित आहेत, ह्यांस निरोपही देतां येत नाहीं!" असें म्हणतांच नाना बोलले, "त्या गरिबांना शिव्या कशास देतां? आपण तिखट लोकांस घालवीत असतां म्हणून ऐकलें होतें तें प्रत्यक्ष आजच पाहिलें! आतां लोणीदहीं आणवा."

भोजनें होत आलीं तों दाजींच्या पूर्वसूचनेप्रमाणें रामाजी नाईक—ह्यांचा गळा फार मोठा व सुस्वर होता—ह्यांनीं दाजींच्या पाठीमागें राहून खड्या उंच स्वरांत असा श्लोक म्हटला कीं नाना दचकून मागें पाहूं लागले! दाजींनीं सांगितलें, हे आमचे पदरींच रामाजी नाईक गोखले असतात. नाना बोलले, "सारें खरें, परंतु हा मांडव उडाला! आतां धर्मास दुसरा श्लोक म्हणवूं नका." नंतर भोजनें उरकलीं. कचेरीस येऊन विडे घेतले.

मेजवानीनंतर कचेरींत इतरांस अहेर केले व पागोट्याचा पदर चुणून नानांच्या हातांत दाजींनीं दिला. नानांनीं मोकळें पागोटें पाहून मनांत ताडलें कीं ही परीक्षा दिसते. अहेर तर नाकारतां येईना. नानांना स्वत: डोक्याला पागोटें बांधतां येईना! दाजी आपला हट्ट सोडीनात! शेवटीं नानांनीं लहान मुलें डोक्यास गुंडाळतात तसें कसेंबसें तें पागोटें डोक्यास गुंडाळलें. शेला घालून नमस्कार होईपर्यंत मोठी पराकाष्ठा झाली! नंतर चांगलें बांधवलेलें दुसरें पागोटें नानांनीं घातलें. निरोप घेऊन निघाले त्या वेळेस नाना आपल्या उपाध्यायास बोलले, "गोविंदभटजी, दाजींनीं आमची परीक्षा पाहिली! आम्हांस तिखट घातलें, श्लोक म्हणविला आणि मला पागोटें बांधावयास येतें किंवा नाहीं हें कोणास ठाऊक नव्हतें तीही परीक्षा पाहिली." असें म्हणून पालखींत बसून आपल्या घरीं गेले.

एके दिवशीं दाजी आपले घरीं भोजन करून विडे खाऊन बसावयाच्या पांढऱ्या फाटक्या बुरणुसावर बसले. तों अकस्मात् नाना फडणीस बातमी राखून आले ते फाटक्या बुरणुसावर बसले. दाजी बोलले, 'नाना, हें

काय? अरे गालिचा आणा.' तों नाना बोलले,' कशाला गालिचा? हा बुरणूस बरा आहे! दाजी, बुरणूस धड नाहीं कीं काय?' तेव्हां दाजी बोलले, 'नाना, आमचें शिलेदाराचें काय? मिशीवर तांदूळ ठेवून संसार करावयाचा!' असें म्हणतांच नाना हसूं लागले.

अशा तऱ्हेनें नानांची दाजींवर पूर्ण कृपा असे. पुरंदरास दाजींनीं श्रीमंतांजवळ मुखत्यारी केली. वाड्यांत दरोबस्त हुकूम दाजींचा असे. नाना त्यांत ढवळाढवळ करीत नसत.

## .... २२ थट्टेखोर विनोदी दाजी



पुरंदरास असतां नाशाकाकडे त्रिंबकच्या किल्ड्याच्या बंदोबस्तास दाजी गेले होते. त्या वेळीं रघुनाथरावदादा कुरुंदवाडकर ह्यांनीं वेरूळची पाटीलकी खरेदी केली होती. तेव्हां खरे पाटील कोण हें गांवकऱ्यांस माहीत नसल्यामुळें गांवकरी भेटीस आले तेव्हां ह्या रघुनाथरावांस एक काळी घोंगडी व हातांत काठी देऊन गांवकऱ्यांत नेऊन उभें केलें व भेट आणविली ती

त्यांच्याकडून दाजींनीं स्वतः पाटील बनून आपणापुढें ठेवविली. रघुनाथरावास कुणब्यांत बसविलें. नंतर पाटील बनलेल्या दाजींनीं गांवकऱ्यांस निरोप दिला. मग खरेखुरे पाटील जे रघुनाथरावदादा त्यांनीं घोंगडी व काठी फेकून दिली !

एकदा परशुरामभाऊंची पत्नी गरोदर आहे असें दाजींस समजलें. मग डोहाळ्याची भेट दाजींनीं पुरंदराहून रवाना केली, ती तासगांवास आली. दाजींचें पत्र परशुरामभाऊंनीं वाचून पाहिलें त्यांत सोबत भेट पाठवीत आहें असा मजकूर होता. ती भेट भाऊंनीं घरांत आपल्या पत्नीकडे पाठविली व सोडून पाहाण्यास सांगितलें. भेटीचें बोचकें सोडलें. त्यांत बाहेरून पांढरें कापड, आंत खारवा, त्याचे आंत गजनी, त्याचे आंत किनखाब वगैरे असे सात तट होते. आंत रुप्याचा डबा. डब्यांत खेंकडा पाहिला तों सारीं हसूं लागलीं ! हें वर्तमान परशुरामभाऊंस समजलें. तेव्हां सर्वांचा एकच हंशा पिकला !

विनोदमस्करी करण्याचा हा संप्रदाय दाजींपासून पटवर्धनांच्या घरीं प्रसिद्ध झाला.

अनुक्रम 28609
विभाग बा.वा.
क्रमांक १८४२
नों. दि.

**खारवा** — गडद लाल रंगाचें जाड कापड ( गाद्या, उश्या करण्यासाठीं ).

**गजनी** — अर्धसुती, अर्धरेशमी उंची कापड ( ‘ गझनी ’ शहरांत होणारें ).

**किनखाब** — जरीच्या वेलबुट्टीचें रेशमी कापड.

## .... २३
## धाडशी हिकमती दाजी



भवानराव पंतप्रतिनिधी पूर्वी एकदा रघुनाथरावदादासाहेब ह्यांच्या बंदींत होते. तेव्हां पंतांस तेथून:सोडवावें अशी मसलत पटवर्धनांनीं ठरविली. नंतर दाजींनीं पुराणिकाचा वेष घेतला. बरोबर एक शिष्य, त्याच्याजवळ पोथी, ह्याप्रमाणें प्रहर रात्रीं गेले. चौकीदारानें कोण आहे म्हणून विचारलें. 'मी पंतांचा पुराणिक आहें. पुराण सांगावयास जात आहें.' असें दाजींनीं सांगितलें. चौकीदार पुराणिकांस आंत सोडीत. हे आंत गेले. तों पंतांनीं ओळखिलें. थोडा वेळ बसून पंतांस दाजींनीं निघावें अशी सूचना केली. तेव्हां पंत बोलले, 'दाजी, हें काय करतां ? सापडल्यास उभयतांची अब्रू जाईल.'

• दाजी बोलले, 'ही माझी पोथी काखेंत घ्या.' ती पंतांनीं काखेंत घेतली. प्रथम शिष्य आणला तो शूद्र होता. त्यास ब्राह्मणाचा वेष दिला. तो शूद्र पुढें, त्याच्या पाठीमागें दाजी, त्यांच्या पाठीमागें भवानराव प्रतिनिधि ह्याप्रमाणें निघाले. चौकीदारानें विचारलें तेव्हां 'पुराणिक आहें. पुराण जाहलें. आतां माघारी जातों.' असें दाजींनीं सांगितलें. चौकीदार बोलले,

'ह्या तिसरा कोण?' दाजी बोलले, 'पंतांनीं पोचवावयास माणूस दिला आहे.' असें म्हणून गोटाच्या बाहेर पडले. तेथें ह्यांजकडील सरंजाम तयार होताच. निघून पार झाले. दुसऱ्या दिवशीं प्रात:काळीं समजलें कीं प्रतिनिधि पळाले! तेव्हांपासून दाजींवर पंतांचा पूर्ण लोभ जडला, इतका कीं ते दाजींच्या अर्ध्या वचनांत वागत!


पंतांनीं वरचेवर दाजींस कऱ्हाडास एक वेळ यावें असा आग्रह केला होता. त्याप्रमाणें सवड काढून दाजी आपल्या मुलासह कऱ्हाडास गेले. बरोबर पालखी, दहा पांच घोडीं वगैरे सरंजाम होता. दाजी येत आहेत अशी बातमी समजतांच पंत लवाजमा, हत्ती, पालखी, स्वार घेऊन थाटानें दाजींस सामोरे गेले. तें पाहून दाजी बोलले, 'किंवडा सामोरा आला.' पंतांस मागें एका लढाईत गदेसारखें हत्यार लागून त्यांचे कान गेले होते व त्यांस ऐकूं येत नव्हतें. पंतांनीं दाजींजवळ जाऊन त्यांस वांकून नमस्कार केला. दाजी बोलले, 'आपण कशास्तव आलां? आम्ही सेवक आपले.' पंत बोलले, 'आपण वडील बंधु म्हणून आलों!' पालखींत न बसतां पायींच वाड्यांत गेले. नमस्कार झाल्यावर दाजींना पिक्या आंब्यांचा उपाहार झाला. त्या वेळीं दाजींचे चिरंजीव शेलापागोटें काढून पाय धुऊन पाटावर बसले. दाजी तसेच बसले. पंत आंब्यांचीं नांवें सांगून काप वाढीत. पंत बोलले, 'दाजी, तुमचे चिरंजीव अंगरखापागोटें काढून आंबे खावयास बसले, आणि आपण तसेच बसलां?'

दाजी बोलले, 'त्यास काय ठाऊक? आंबे खावयास पागोटें काढल्यावर मग जेवावयास काय करावें?' नंतर पंत हसूं लागले. मग भोजनें झालीं. आठ दिवस पंतांनीं दाजींस ठेवून घेतलें. पंत बोलले, 'दाजी, तुम्ही माझेजवळ राहावें. तुम्ही जितकें पाणी प्यावयास सांगाल तितकें पाणी पिऊन राहीन.'

दाजी बोलले, "मी एकाचा चाकर आहेंच, आणि आपलेजवळ कसा राहूं? त्यांजपाशीं मागून घ्यावें. त्यांनीं निरोप दिला तर राहीन."

## .... २४

# दाजी आणि तोतया



नारायणरावाच्या वधानें रघुनाथरावदादासाहेब ह्यांनीं एक भयंकर पेचप्रसंग पेशवाईच्या मुत्सद्द्यांना निर्माण केला. त्यांतून हिकमतीनें निभावून ते बाहेर पडतात, तर पानिपतच्या युद्धांत ठार अगर बेपत्ता झालेल्या सदाशिवरावभाऊंच्या तोतयानें दुसराच पेचप्रसंग निर्माण केला होता. हें तोतयाचें बंड बरेंच दिवस चाललें. ह्या तोतयाच्या चौकशीसाठीं सरकारांतून दाजींची नेमणूक झाली. दाजी दुसरा मातबर मनुष्य बरोबर घेऊन दौलताबादेस गेले. तेथें सरकारच्या कारकुनाला बरोबर घेऊनच दाजी तोतयाकडे चार वेळ गेले. दाजींनीं त्यास विचारलें, "भाऊसाहेब, ह्यांच्या व आमच्या बहुत वेळ गांठी पडोन बोलणीं जाहलीं आहेत. त्यांतील खुणेची गोष्ट एक तरी सांगा." तोतया बोलला त्यांतील एकही गोष्ट दाजींस पटेना. तेव्हां त्याला तोंडावर दाजींनीं म्हटलें, "तूं साफ लबाड आहेस. थोराचे नांवास बट्टा लावावयास आलास." ह्याप्रमाणें साफ उत्तर सांगून दाजी निघून आले.

पुढें तोतया मिरजेस आणून त्याला किल्ल्यांत कैदेंत ठेवलें होतें. तेथें कांहीं मंडळी त्याच्याकडे जात येत. तेव्हां कांहीं पेचप्रसंग न यावा म्हणून दार्जीच्या सूचनेवरून त्याला रत्नागिरीच्या किल्ल्यांत पाठविलें होतें. तेथें फंदफितुरी होऊन तोतयानें तो किल्ला बळकावून दरोबस्त कोंकणपट्टींतील सारे किल्ले घेतले. पुरंदरास पत्र आलें कीं हरिपंत फडके ह्यांजकडचा सुवर्णदुर्ग किल्ला तोतयानें घेतला. तो किल्ला हरिपंतांच्या पुतण्याच्या ताब्यांत होता. तेव्हां पुरंदरास दाजी राहात त्या निम्म्या घरांत दसरचे कारकून व हरिपंत जेवीत. मध्यें कूड होता. 'हरिपंतांस पुष्पें समर्पण करावीं' असें योजून जेवतांना दार्जीनीं विचारलें, "देशमुख, आज सरकारांत तोतयाचें वर्तमान काय आहे?" देशमुख बोलले, "सुवर्णदुर्ग किल्ला घेतला म्हणून पत्रें आलीं."

दाजी – "तो किल्ला कोणाकडे होता?"

देशमुख – "हरिपंतांकडे होता."

दाजी म्हणाले, "अहो, हे लुच्चे असेच किल्ले गमावतील! आमचेकडे किल्ला कोणी देईना! कसा तोतया घेतो पाहीन!" असें म्हणतांच हरिपंत बोलले, "दाजी, मी समजलों. आमची पूजा आपण केली."

दाजी बोलले, 'तात्या, आपणांस मीं कांहीं म्हटलें नाहीं.'

"दाजी, त्या पोरानें माझे तोंडास काळोखी आणिली." तात्यांनीं सांगितलें. ह्याप्रमाणें भोजन करतांना बोलले. नंतर दाजींकडे येऊन हरिपंतांनीं सर्व गोष्ट सांगितली.

क्रमांक २५६६९
आ. वा.
नोंद दि.

.... २५

# दाजींची अखेर



पुरंदरास असतांना दाजींनीं सरकारचाकरी एकनिष्ठपणें केली व लौकिक संपादन केला. तीन पिढ्यांची माहिती छातीठोकपणें सांगणारे, सर्वांच्या आदरास पात्र झालेले, शूर, स्वामिभक्त व स्वाभिमानी शिलेदार अशा दाजींनीं १७८० च्या सुमारास आपली इहलोकची यात्रा संपविली.

पुरुषोत्तमरावांच्या पश्चात् त्यांची पत्नी कृष्णाबाई–आई–ही मंगळवेढ्याहून इनामगांव आंवें येथें येऊन राहिली. वडील पुत्र हरिहरराव ह्यांचें वय १४ वर्षांचें होतें. इतर मुलें लहान. सर्वांचें नीटपणें संगोपन आईनें केलें. धर्मकृत्य व महायात्रा केली. प्रथम पुत्र हरिहरराव तात्या हे परम मातृभक्त होते. दाजींच्या पाठीमागें पुण्यांत श्रीमंत सवाई माधवरावांपाशीं होते. श्रीमंत आणि नाना फडणीस ह्या दोघांची जशी दाजींवर तशीच तात्यांवरही पूर्ण कृपा होती. दाजींची स्वामिभक्तीची परंपरा तात्यांनीं पुढें चालविली.

इतिहासांत नमूद न झालेलें परंतु बखरींतून वर्णिलेलें तीन पिढ्यांच्या दाजींचें हें चरित्र आबालवृद्धांना स्फूर्तिदायक ठरणार नाहीं का ?



IRBK-0105316